रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २१० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २८ डिसेंबर २०२४


किंमत ४ ₹


## सात दिवसांचा दुखवटा जाहीर

नवी दिल्ली : केंद्र सरकारने माजी पंतप्रधानांच्या स्मरणार्थ सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. तर, कर्नाटक सरकारने माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत शुक्रवारी (दि.२७) शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयांमध्ये सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. कर्नाटकमध्ये सरकारी सुट्टी जाहीर झाल्यानंतर लगेचच शुक्रवार, २७ डिसेंबर रोजी इतर राज्यांमध्ये शाळा आणि बँकांना सुट्टी असेल की नाही, यावर अटकळ सुरू झाली.

## तेलंगणामध्येही शासकीय सुट्टी

तेलंगणामधील रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शुक्रवारी सरकारी कार्यालये आणि शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याची घोषणा केल्यानंतर सुट्टी जाहीर करण्यात आली. तर, दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी त्यांचे दिल्लीतील सर्व सरकारी कार्यक्रम रद्द केले आहेत.



## देशाचा 'अर्थ'कणा, 'मनमोहन' व्यक्तिमत्त्वाला

# अलविदा...

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

देशाच्या अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारे तसेच जागतिक अर्थव्यवस्थेत भारताला नवीन उंची मिळवून देणारे माजी पंतप्रधान तसेच ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांनी गुरुवारी (दि. २६) नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. निधनसमयी ते ९२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे देशाने एक अर्थऋषी गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर उद्या शनिवारी (दि.२८) शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे देशभरात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला असून, सर्व शासकीय कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. पान ६ वर

> "डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनाने सारा देश शोकाकुल झाला आहे. कठीण परिस्थितीवर मात करून उच्चशिक्षण घेत ते विख्यात अर्थतज्ज्ञ बनले. त्यांच्या विचारांचा देशाच्या आर्थिक धोरणांवर अमीट ठसा उमटला. मनमोहनसिंग पंतप्रधान व मी गुजरातचा मुख्यमंत्री असताना आम्ही नेहमी एकमेकांशी संवाद साधत होतो. त्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो."
>
> – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> "मनमोहन सिंग यांनी प्रचंड ज्ञान आणि सचोटीने भारताचे नेतृत्व केले. त्यांची नम्रता आणि अर्थशास्त्राची सखोल समज देशाला प्रेरणा देत होती. मनमोहन सिंग यांची नम्रता आणि अर्थशास्त्राची असलेली सखोल जाण यातून देशाला प्रेरणा मिळते. मी एक गुरु आणि मार्गदर्शक गमावला आहे. आपल्यापैकी लाखो जण त्यांना अभिमानाने आठवणीत ठेवतील."
>
> – राहुल गांधी, विरोधी पक्षनेता, लोकसभा



### आज होणार अंत्यसंस्कार

मनमोहन सिंग यांच्यावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांची मुलगी अमेरिकेत वास्तव्याला असून, त्या येत नाहीत तोवर अंत्यसंस्कार केले जाणार नाहीत. मीडिया रिपोर्टनुसार, शुक्रवारी रात्री एक वाजता अमेरिकेतून मनमोहन सिंग यांची मुलगी भारतात परतण्याची शक्यता आहे. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कुटुंबियांच्या इच्छेनुसार त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील.

## राजकीय जीवनपट

- १९३२ पंजाबच्या गाहमध्ये जन्म.
- १९५७ : केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदवी.
- १९६२ : ऑक्सफोर्ड विद्यापीठातून डी फील.
- १९८७-१९९० जीनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस.
- १९७१ : आर्थिक सल्लागार, विदेश व्यापार मंत्रालय, भारत
- १९७२ : मुख्य आर्थिक सल्लागार, वित्त मंत्रालय, भारत.
- १९७६ : सचिव, वित्त मंत्रालय (आर्थिक व्यवहार विभाग), भारत सरकार. सदस्य- वित्त, अणुऊर्जा आयोग.
- १९८० : सदस्य-सचिव, नियोजन आयोग.
- १९८० : अध्यक्ष, भारत-जपान संयुक्त अभ्यास समितीची भारत समिती
- १९८२ : गव्हर्नर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया.
- १९८३ : सदस्य, पंतप्रधानांची आर्थिक सल्लागार परिषद.
- १९८५ : अध्यक्ष, इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन.
- १९८५ : उपाध्यक्ष, नियोजन आयोग.
- १९८७ : महासचिव आणि आयुक्त, दक्षिण आयोग, जिनिव्हा.
- १९९० : पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार.
- १९९१ : केंद्रीय अर्थमंत्री आणि नंतर राज्यसभेवर निवड.
- १९९१ : आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंटच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सवर भारताचे राज्यपाल.
- १९९५ : दुसऱ्यांदा राज्यसभेवर निवड.
- १९९६ : सदस्य, अर्थ मंत्रालय सल्लागार समिती.
- १९९९: विरोधी पक्षनेते, राज्यसभा.
- १९९८: सदस्य, वित्त समिती.
- १९९९: दक्षिण दिल्लीतून १३ व्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या विजय कुमार मल्होत्रा यांच्याकडून पराभव.
- २००१ : तिसऱ्यांदा राज्यसभेवर पुन्हा निवड.
- २००४ ते २०१४ पर्यंत पंतप्रधान म्हणून दोन टर्म पूर्ण.
- २००७ : चौथ्या टर्मसाठी राज्यसभेवर पुन्हा निवड.
- २०१३ : पाचव्यांदा राज्यसभेवर निवड.
- २०१८ : सहाव्यांदा राज्यसभेवर निवड.

### आजचा अग्रलेख

**अबोल सच्चा सुधारक**

## वेधक

### वनक्षेत्रपालाकडे ५८ तोळे सोने

**वसई :** जमिनीच्या प्रकरणात २० लाख रुपयांची लाच घेणाऱ्या मांडवीचा वनक्षेत्रपाल संदीप चौरे याच्या मिरा रोड येथील घरात एक कोटी ३७ लाखांची रोकड आणि ५८ तोळे सोने आढळून आले आहे. जमिनीच्या बाजूने निकाल देण्यासाठी मांडवी परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल संदीप चौरे याने २० लाखांची मागणी केली होती. त्यानुसार मंगळवारी पालघरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्याविरोधात मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्याला पकडण्यासाठी सापळा लावला. मात्र तो फरार झाला होता.

### टेम्पोने पाच जणांना चिरडले; महिला ठार

**मुंबई :** कुर्ला येथे भरधाव बेस्ट बसने पादचाऱ्यांना चिरडल्याची घटना ताजी असतानाच शुक्रवारी सायंकाळी घाटकोपर परिसरात भरधाव टेम्पोने पाच जणांना चिरडल्याची घटना घडली. या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. चिराग नगर मार्केट परिसरात सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. दरम्यान, नागरिकांनी चालकाला बेदम चोप देत घाटकोपर पोलिसांच्या स्वाधीन केले. नारायण नगर येथून थंड पेय घेऊन जाणाऱ्या टेम्पो चालकाचे चिराग नगर मार्केट परिसरात वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला.

# जड-अवजड वाहनांना बंदी

### कोंडीबरोबरच अपघात रोखण्यासाठी अधिसूचना जारी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी २५ डिसेंबर ख्रिसमसपासूनच अनेकजण सुट्टीवर गेले आहेत. या दिवसांमध्ये शाळांना देखील सुट्टी असते. अशावेळी अनेक कुटुंबं बाहेर जाण्याचा प्लान करतात. फॅमिली पिकनिक म्हणून अलिबाग हे सर्वांचं आवडीचं ठिकाण आहे. त्यामुळे पर्यटकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, याकरिता अलिबाग व मुरूड तालुक्यात २८ आणि २९ डिसेंबर रोजी अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनानं हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अलिबागमध्ये सुट्टीसाठी येणाऱ्या पर्यटकांचा प्रवास आता सुखाचा होणार आहे.



अनेकदा जड वाहने रस्त्यांवर असल्यामुळे जास्त ट्रॅफिक जामची शक्यता असते. तसेच या वाहनांमुळे अपघात होण्याचीदेखील दाट शक्यता असते. या सगळ्याचा विचार करता, हा निर्णय घेण्यात आला आहे.

थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी रायगड जिल्ह्यात लाखोंच्या संख्येने पर्यटक येणार आहेत. पर्यटकांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा यासाठी जिल्हा प्रशासनाने दोन दिवस अवजड वाहनांना बंदी घातली आहे. शनिवारी (दि.२८) पान ६ वर

### या मार्गावर कोंडीची शक्यता

वडखळ–अलिबाग हा रस्ता एकेरी रस्ता आहे. अलिबाग–रेवस व अलिबाग–रेवदंडा–मुरूड हे रस्ते अरूंद आहेत. पर्यटकांची प्रचंड प्रमाणात येणारी व जाणारी वाहने व त्याच वेळी रस्त्यावरून होणारी डंपर, ट्रक व इतर जड–अवजड वाहनांची वाहतूक कोंडी होण्याची तसेच अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

### समुद्रकिनारे हाऊसफुल्ल

रायगड जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे. २०२४ या वर्षाला निरोप व २०२५ या नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मांडवा, किहीम, अलिबाग, आक्षी, नागाव, रेवदंडा, काशिद, मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन, महाड या पर्यटनस्थळी पर्यटक मोठ्या प्रमाणात येणार आहेत. काही पर्यटक जिल्ह्यात दाखल झाले आहेत. राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच शहरामध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून, महामार्गावरील जड–अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे.



# वर्षभरात सव्वाशे आंदोलने, मोर्चे

### काही प्रश्न सुटले, काही लालफितीत अडकले

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

रायगड जिल्ह्यातील औद्योगिक कंपन्यांतील प्रश्नांसह पिण्याचे पाणी, नोकरीत कायम करणे, अशा अनेक मागण्यांसाठी वर्षभरात १२५हून अधिक मोर्चे व आंदोलने करण्यात आली आहेत. काही प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न होत असतानाच काही प्रश्नांची सोडवणूक करण्याचे आश्वासन दिल्याने हे प्रश्न अजूनही लालफितीत अडकूनच आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये दोन हजारांहून अधिक प्रकल्प आहेत. जिल्ह्यात काही प्रकल्प नव्याने होऊ घातले आहेत. या प्रकल्पांमध्ये नोकरी देण्यापासून शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलने करण्यात आली आहे. आदिवासी समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक होण्याबरोबरच ओबीसी, मराठा व धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नांबाबतही मोर्चे काढण्यात आले.

जिल्ह्यामध्ये मार्च महिना उजाडल्यावर पाणीप्रश्न कायमच भेडसावत आहे. शासनाने जलजीवन योजना राबवून अनेक गावे पाण्यापासून वंचित राहिली आहेत. काही ठेकेदारांनी आपल्या मनमानी कारभाराने या योजेनचे काम केल्याने गावांतील ग्रामस्थांनी याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्हा परिषदेसमोर उपोषण केले आहे. जुनी पेन्शन योजना लागू करण्याबरोबरच कंत्राटी परिचारिकांना कायम करण्यासाठी अनेकवेळा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलने करण्यात आली. तसेच अंगणवाडी सेविकांसह महसूल, शिक्षकांनीदेखील त्यांच्या मागण्यांसाठी पान ६ वर

### आंदोलनांचा आकडा अधिक

जिल्ह्यामध्ये ४२ मोर्चे, ८३ आंदोलने, २४ धरणे, ३० निदर्शने आणि १० हून अधिक जणांनी उपोषण केले आहे. त्यामध्ये सर्वाधिक आंदोलने ही जिल्ह्यातील महत्त्वाचे प्रकल्प व अंतर्गत रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांच्या दुरुस्तीसंदर्भात करण्यात आली. स्वत:च्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या उपोषण व आंदोलनकर्त्यांपैकी ३० टक्क्यांहून अधिक नागरिकांना पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागले आहे. यातील काहींचे प्रश्न सुटले. परंतु, काहींचे प्रश्न अजूनही शासनाच्या लालफितीत अडकून असल्याचे चित्र आहे. या नव्या वर्षात या प्रश्नांची सोडवणूक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# काशीद समुद्रकिनारी पर्यटकाचा बुडून मृत्यू

**। मुरुड जंजिरा । सुधीर नाझरे ।**

मुरुड व काशीद समुद्र किनारी नाताळची सुट्टी असल्याने पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील पिसोली येथील महात्मा ज्योतिराव हायस्कूलचा ११ जणांचा समूह काशीद समुद्र किनारी फिरण्यास आला होता.

यामध्ये शिक्षकांसह मुख्याध्यापकदेखील होते. यातील बहुतेक लोक काशीद समुद्रकिनारी पोहण्यासाठी उतरले. पोहता-पोहता या शाळेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र देशमुख (५६) हे खोलवर पाण्यात खेचले गेले. ते बराच वेळ पाण्याखाली राहिले. त्यांना जीवरक्षकाने तातडीने पाण्याबाहेर काढले. त्यानंतर त्यांना तात्काळ बोर्ली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथून अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पर्यटनासाठी आलेल्या शिक्षकांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून, या घटनेचा अधिक तपास मुरुड पोलीस करीत आहेत.

# तळीरामांना फक्त चार पेग

। मुंबई । प्रतिनिधी ।

नवं वर्ष सुरू होण्यासाठी अजून काही दिवस शिल्लक आहेत. मात्र, आतापासूनच अनेकांनी नववर्षाच्या स्वागताचं नियोजन करण्यास सुरुवात केलं आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेकांनी ३१ डिसेंबर ते १ जानेवारी या काळात पार्टीचं आयोजन केलं आहे. काही जण आपल्या कुटुंबासोबत आणि मित्रांसोबत घरीच नव्या वर्षाचं सेलिब्रेशन करणार आहेत. तर काही जण मात्र मस्त हॉटेलमध्ये जाऊन दारूचे ग्लास रिचवत नवं वर्षाचं सेलिब्रेशन करण्याच्या बेतात आहेत. मात्र, नव्या नियमांनुसार नव्या वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी जे हॉटेल किंवा बारमध्ये ३१ डिसेंबरला जाणार आहेत, अशा मद्यपींना केवळ चार पेग एवढीच दारू मिळणार आहे.



चार पेगपेक्षा अधिक दारू यावेळी कुठल्याही हॉटेलमध्ये मिळणार नाही. याबाबत हॉटेल असोसिएशनकडून माहिती देण्यात आली आहे. नव्या वर्षाचं सेलिब्रेशन करण्यासाठी अनेकजण हॉटेलमध्ये येतात. ते प्रमाणाबाहेर दारू पितात. त्यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो.

### चालकाची व्यवस्था करणार

सरकारकडून नववर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्व हॉटेल आणि बारसाठी नवी गाईडलाईन्स जारी करण्यात आली आहे. कोणत्याही ग्राहकाला दारू देण्यापूर्वी त्याच्या वयाबाबत खात्री करून घ्यावी. त्याच्या वयाचा पुरावा त्याच्याकडे मागावा. अल्पवयीन असेल तर दारू देऊ नये. तसेच दारू पिल्यामुळे जर त्याला घरी जाण्यास समस्या असेल, तर अशा व्यक्तींसाठी चालकाची सोय करावी. नववर्षाच्या स्वागतासाठी सकाळी पाच वाजेपर्यंत हॉटेल आणि बार सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे.

### अलिबाग चॅम्पियन ट्रॉफीचे जल्लोषात अनावरण

# नववर्षात क्रीडाप्रेमींसाठी पर्वणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत प्रशांत नाईक मित्रमंडळ अलिबाग आयोजित अलिबाग चॅम्पियन ट्रॉफी २०२५ नाईट टेनिस क्रिकेट लीग क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. ही स्पर्धा ९ ते ११ जानेवारीला तीन दिवस अलिबागमध्ये रंगणार आहे. अलिबागजवळील कुरूळ येथील क्षात्रैक्य माळी समाज सभागृहात शुक्रवारी (दि.२७) चषकाचे अनावरण माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या हस्ते झाले.






यावेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष तथा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्यक्षा तथा शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग नगर परिषदेचे माजी बांधकाम सभापती तथा जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, ॲड. नीता पाटील, नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका संजना कीर, अशोक प्रधान, अक्षय्या नाईक, अश्वीन लालन, महेश पाटील, प्रकाश राठोड, कपिल खरवडकर आदी मान्यवर, संघ मालक, संघाचे व्यवस्थापक, कर्णधार व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निमंत्रित १६ संघांमध्ये होणार लढत

या स्पर्धेत निमंत्रित १६ संघ आहेत. त्यामध्ये साखरमधील प्रदीप स्पोर्ट्स, नाखवा वॉटर स्पोर्टस्, प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्ट्स, अलिबागमधील यू.व्ही. स्पोर्ट्स, ए.बी. ग्रुप, कुबेर इलेव्हन, आर्यन स्ट्रायकर्स, जे.डी. भार्गवी इलेव्हन, फैझी इलेव्हन, नवगावमधील रियांश इलेव्हन, वरसोली येथील त्रिश्राव्या इलेव्हन, आंबेपूरमधील पान ६ वर

# तळोजा-कल्याण प्रवास होणार सुखकर

### दोन वर्षात सुरु होणार मेट्रो

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

एमएमआरडीएने आता ऑरेंज मेट्रो लाइन १२चे काम हाती घेतले आहे. या मेट्रोचे काम ३१ डिसेंबर २०२७ पर्यं पूर्ण होणे अपेक्षित असून कल्याण आणि तळोजा अशी दोन शहरे जोडण्यात येणार आहेत. एकूण २३,७५६ किमीचा कॉरिडोर असणार आहे.

एमएमआरडीएने कंत्राटदारांची नियुक्ती केली आहे. या मेट्रो प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. मुंबई मेट्रो लाइन १२ला दोन इंटरचेंज असणार आहेत. एक मुंबई मेट्रो लाइन ५वरील कल्याण आणि दुसरा नवी मुंबई मेट्रो लाइन १ वरील अमनदूत (तळोजा) येथे कनेक्ट होणार आहे.

या मेट्रोमुळं कल्याण-डोंबिवली ते नवी मुंबईचा प्रवास फक्त ४५ मिनिटांत पूर्ण होणार आहे. मुंबई-ठाणे-भिवंडी-कल्याण-डोंबिवली-नवी मुंबई असा वर्तुळाकार मेट्रो मार्ग तयार होईल आणि प्रवाशांना अत्यंत किफायतशीर दरात, कमीत कमी वेळेत आरामदायी आणि सुलभ प्रवास करता येणार आहे. मेट्रो मार्गाच्या उभारणीमुळं कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्र आणि कल्याण तालुक्यातील ग्रामीण भाग थेट नवी मुंबई, तळोजा या भागांसोबत जोडला जाणार आहे. त्यामुळं कल्याण-डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई आणि पनवेलमधील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



# विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रमाणपत्र कोर्स

**तळा :** तळा शहरातील द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वक्तृत्व, सूत्रसंचालन आणि कार्यक्रम नियोजन या ऑनलाईन माध्यमातून सात दिवसीय प्रमाणपत्र कोर्सचे दि.१६ ते २३ डिसेंबरदरम्यान आयोजन करण्यात आले होते. या कोर्सचे उद्घाटनपर प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. तृप्ती थोरात, प्रा. भरत चाळके, प्रा. सोनम पवार आणि मराठी विभागाचे समन्वयक प्रा. विजय चव्हाण उपस्थित होते. एकूण सात सत्रांच्या या मार्गदर्शनपर शिबिरासाठी वेगवेगळ्या महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. निधी पटवर्धन, प्रा.डॉ. अरुण शिंदे, प्रा.डॉ. भगवान लोखंडे, प्रा. शब्बीर हज्जू, प्रा.डॉ. संगीता चित्रकोटी, हनुमंत येवले, प्रा. प्रणय इंगळे आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. वक्तृत्व कला, सभाशास्त्र, व्याख्यानाची पूर्वतयारी, प्रभावी सूत्रसंचालन, भाषणाची तयारी, सादरीकरण इत्यादी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२८ डिसेंबर**

१)श्रीम.विजया वसंत आठवले, ब्राम्हणआळी अलिबाग, २८-१२-१९४०

२) श्री.भागवत दुलीचंद पाटील पिंपळभाट, अलिबाग, १४-१२-१९५२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक विश्वनाथ गजानन म्हात्रे व यशवंत गजानन म्हात्रे दोघे रा. मु. पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे आशिलांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे, त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| झिराड ता. अलिबाग जि. रायगड | ३४९ जुना गट नं. ४६८ | ०-५९-३० पो.ख. ०-०३-५० एकूण क्षेत्र ०-६२-८० | १४.४५ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २८/१२/२०२४

सही /-
**ॲड. रिया गणेश पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
रा. मु. नेहुली, पो. खंडाळे
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबाईल नं. ८८०५३२८६४६/९६०७३३१९७५

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१**
E-mail ID : aresalibag@gmail.com

जाक्र सनिअ/कलम १०१/ अर्ज क्रं. ५९-२०२४/९५१/सन २०२४ दिनांक २७/१२/२०२४

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,**

अर्ज क्रमांक ५९/२०२४

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग ... अर्जदार
तर्फे लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक, अलिबाग
विरूद्ध
१. श्री. पांडुरंग धोंडु दिवकर (मयत)
वारस - १ अ. श्रीमती अनिता पांडुरंग दिवकर,
मु.पो. रामराज, ता. अलिबाग जि. रायगड
२. श्री. सुरेश खेळ्या दरोडा
मु. खैरवाडी महान पो. रामराज ता. अलिबाग जि. रायगड
३. श्री. अमोल लक्ष्मण बडे,
मु. भाल, पो. थळ ता. अलिबाग, जि. रायगड प्रतिवादी

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु ४६९३१८/- साठीचा अर्ज.

१. ज्या अर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग तर्फे लंकेश भगवान नागांवकर, बँक निरीक्षक यांनी दिनांक २९/०७/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

२.आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ४६९३१८/- (अक्षरी रुपये चार लाख एकोणसत्तर हजार तिनशे अठरा मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

३.आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब (४) नुसार सर्व प्रतिवादी क्रमांक १ चा सद्याचा पत्ता उपलब्ध नसलेने जाहीर नोटीस देणेची अर्जदाराने विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी दिवसाचे दुपारी ३.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत,पहीला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

४.या कामी तुम्ही गैरहजर राहीलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २७ डिसेंबर २०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे कुरुळ ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद बिनशेती जमिन मिळकत ही आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | विद्यमान मालक | भुमापन नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| कुरुळ ता. अलिबाग | १.हिमांगी हेमंत म्हांबरे २.आयुष हेमंत म्हांबरे ३.आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/२ | बिनशेती ३-२२-७५ | ३२.२८ |
| कुरुळ ता. अलिबाग | १.हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/३ | बिनशेती ३-१९-०० | ३१.९० |
| कुरुळ ता. अलिबाग | १. हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/४ | बिनशेती ३-१९-०० | ३१.९० |
| कुरुळ ता. अलिबाग | १. हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/५ | बिनशेती ३-९१-५० | ३९.१५ |
| कुरुळ ता. अलिबाग | १. हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं ६ | बिनशेती ३-७४-७५ | ३७.४८ |
| कुरुळ ता. अलिबाग | १. हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/७ | बिनशेती ३-८२-५० | ३८.२६ |
| कुरुळ ता. अलिबाग | १ हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/८ | बिनशेती ३-६१-२५ | ३६.१२ |
| कुरुळ ता. अलिबाग | १. हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/९ | बिनशेती ३-३०-०० | ३३.०० |
| कुरुळ ता. अलिबाग | १ . हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/१० | बिनशेती ३-००-०० | ३०.०० |
| कुरुळ ता. अलिबाग | १. हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/११ | बिनशेती ३-१३-५० | ३१.३६ |
| कुरुळ ता. अलिबाग | १ हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/१२ | बिनशेती ४-७७-७५ | ४७.७८ |
| कुरुळ ता. अलिबाग | १.हिमांगी हेमंत म्हांबरे २. आयुष हेमंत म्हांबरे ३. आर्णव हेमंत म्हांबरे | ९१/२/ प्लॉट नं/१३ | बिनशेती ३-८४-७५ | ३८.४८ |

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध ताबा कब्जा, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, साठेकरार, भाडेपट्टाकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबतचा कसलाही हक्क व हितसंबंध अथवा विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग
तारीख २७/१२/२०२४

**ॲड. रेखा किरण वाघ**
अलिबाग रायगड

## ग्रुप ग्रामपंचायत वारक
## जाहीर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत वारक मध्ये खालील कामाकरिता ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे परिणाम | निविदा स्तोत्र | रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | विघवली येथे सार्वजनिक शौचालय दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | ७३९३५ | ६ महिने |
| २ | रा.जि.प. शाळा वारक येथे रंगरंगोटी करणे | १ | १५ वा वित्त आयोग अबंधित निधी सन २०२४/२५ | ४०००० | ६ महिने |
| ३ | रा.जि.प. शाळा विघवली येथे पेव्हर ब्लॉक बसविणे | १ | १५ वा वित्त आयोग अबंधित निधी सन २०२४/२५ | ४८७२२ | ६ महिने |
| ४ | रा.जि.प. शाळा वारक आदिवासीवाडी शाळेजवळ गटार बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | ६२१०५ | ६ महिने |
| ५ | विघवली येथील महिलांना धुण्यासाठी घाट पायऱ्या दुरूस्त करणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | २९५७४ | ६ महिने |
| ६ | वारक आदिवासीवाडी येथील समाजमंदिर दुरूस्त करणे | १ | १५ वा वित्त आयोग अबंधित निधी सन २०२४/२५ | ७४५२७ | ६ महिने |
| ७ | कुशेडे/तळे शाळेजवळ गटार बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | १३०१२६ | ६ महिने |
| ८ | वारक येथे अंतर्गत रस्ता तयार करणे | १ | १५ वा वित्त आयोग अबंधित निधी सन २०२४/२५ | १२६१५० | ६ महिने |
| ९ | विघवली येथे डोंगरातील देवाकडे जाणारी घाट वाट तयार करणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | ३९४३२ | ६ महिने |
| १० | वारक विहिर दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | ५०००० | ६ महिने |
| ११ | विघवली विहीरीतील गाळ काढणे व दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | १३०१२६ | ६ महिने |
| १२ | वारक बौद्धवाडी विहिरीला कट्टा बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४/२५ | ६२१०५ | ६ महिने |
| | | | | ८६६८०२ | |

**अटी व शर्ती**
१ निविदा सादर करणेची मुदत ०७ दिवस असेल
२ अंदाजपत्रकीय रकमेच्या एका टक्का इसारा रक्कम भरणे
३ प्राप्त निविदा दि- ०६/०१/२०२५ सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालय वारक येथे सरपंच यांच्या समक्ष उघड्नेत येईल.
४ कोणतेही एका अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच वारक यांनी राखून ठेवला आहे.
५. मा. उप अभियंता सा- बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पंचायत समिती माणगाव शाखा अभियंता तसेच सरपंच ग्रामपंचायत वारक यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेच अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६ निविदा मंजुरी अंती ठेकेदाराने यासह रीतसर करारनामा करून द्यावा लागेल-
७ कामच्या अंदाजपत्रकानुसार काम करावे लागेल-
८ ठेकेदार प्राप्त न झाल्यास स्थानिक ठेकेदार यांना प्राधान्य दिले जाईल.
९ साहित्य व वस्तू यांचा दर्जा उत्तम असला पाहिजे-
१० काम अंतिमरीत्या पूर्ण झाले नंतर कामाची स्थिती पाहून ६ महिनेनंतर सुरक्षा अनामत परत दिली जाईल
११ निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत वारक**
**ता. माणगाव, जि. रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वारक**
**ता. माणगाव, जि. रायगड**

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे भाल, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीपैकी ३-००-०० (चौ.मी.), बिनशेती जमिन मिळकत श्री. उमेशचंद्र जनार्दन टिल्लू व श्रीमती कुंजीवनी सुधाकर चेरू यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| भाल, ता. अलिबाग. | ७६/७/अ/४ | १२-४०-०० एकूण | १२४-०० |

सदरील बिनशेती जमिन मिळकतीपैकी श्री. उमेशचंद्र जनार्दन टिल्लू व श्रीमती कुंजीवनी सुधाकर चेरू यांच्या हिश्श्याची ३-००-०० (चौ.मी.), आकार रू. ३०.०० पैसे ही बिनशेती जमिन मिळकत.

अलिबाग
दिनांक : २७/१२/२०२४.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

## दी नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

**नोंद. आणि ॲडमि. कार्यालय:** २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१. **वसुली विभाग:** प्लॉट क्र-८/सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प)-४१०२०६.
**फोन क्र.** ०२२-२७४५८६२८ **ईमेल पत्ता :** recovery@ncbmumbai.com

### कब्जा नि विक्री सूचना

**(नियम-८(१)अन्वये)**
**(स्थावर मिळकतीकरिता)**

**ज्याअर्थी**
निम्नस्वाक्षरीकारांनी **दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.** चे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सदर ॲक्ट) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत **रु. २५,४६,६२३.०० (रुपये पंचवीस लाख सेहेचाळीस हजार सहाशे तेवीस मात्र)** अशी सूचनेत नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी सदर ॲक्टमधील मिळकतीचे मालक आणि **कर्जदार श्री. योगेश बाबु शर्मा आणि** आणि हमीदार : (१) सौ. निर्मला योगेश शर्मा यांना बोलाविण्यासाठी दिनांक १५/१०/२०२४ रोजीची संद. क्र. एनसीबी/एचओ/आरईसी/१६३/२०२४-२५ मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदारांनी सदरहू रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे, म्हणुन त्याला/तिला/त्यांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **२७.१२.२०२४** रोजी सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ९ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करु नये आणि सदरहू मिळकतीसह केलेला देवघेवीचा कोणताही व्यवहार हा रक्कम ३०.११.२०२४ रोजीप्रमाणे **रु. २६,०४,९९३.००** आणि ०१/१२/२०२४ पासून त्यावरील पुढील व्याज आणि खर्च या रकमेकरिता **दि नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.** च्या प्रभाराच्या अधीन राहील.

**स्थावर मिळकतीचे वर्णन:**

मिळकतीचे नोंदणीकृत गहाण
फ्लॅट क्र. ३०२, ३रा मजला, गणेश कृपा अशी ज्ञात इमारत, प्लॉट क्र. ३७, सेक्टर-३, उलवे तालुक - पनवेल, जि - रायगड, मोज. ३५७ चौ. फू.

**३० दिवसांची सांविधिक सूचना**

वरील नमूद कर्जदार आणि हमीदार यांना व्याज आणि प्रभारांसह **रु. २६,०४,९९३.०० (रुपये सव्वीस लाख चार हजार नऊशे त्र्यान्नव मात्र)** सह व्याज आणि प्रभार ची रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे ३० दिवसांची सूचना देण्यात येत आहे. अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(५)(डी) आणि ९ च्या तरतुदींनुसार सदर सूचनेच्या प्रसिध्दी तारखेपासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर गहाण मिळकत विकण्यात येईल.

**सही/-**
**(सौ. मधुरा अजय राऊळ)**
**प्राधिकृत अधिकारी,**
**दि नॅशनल को-ऑप. बँक लि. करिता, मुंबई**

**दिनांक : २७.१२.२०२४**
**ठिकाण : नवी मुंबई**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धोकवडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत तिचे संबंधित कब्जेदार/मालक याच्याकडुन आमची अशिल हिने कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे :

| कब्जेदार/मालक | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री.श्रेयस श्रीकांत म्हात्रे | ८३६ | १/७ | ०-२१-०० पैकी ०-०५-१० | १-६१ |

सबब सदरच्या मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्या सहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. या प्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदरची मिळकत निर्वेध आणि बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिल हिच्यावर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती,तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : खोपोली
दिनांक : /१२/२०२४

सही/-
**श्री. सचिन रघुनाथ पाटील**
(ॲडव्होकेट)
पहिला मजला, योगेश्वर बिल्डींग,
युनियन बँकेच्यावर, खोपोली,
ता. खालापूर, जि. रायगड
मो. ९४२२६९५६३९

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१९८ /२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. प्रकाश रामचंद्र सुर्वे
वय ७६ वर्षे, धंदा : शेती
रा. मु. पो. तळाशेत (इंदापूर) अर्जदार
ता.माणगांव, जि.रायगड.

विरूद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत तळाशेत,
ता.माणगांव, जि.रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. प्रकाश रामचंद्र सुर्वे यांचे वडील कै. रामचंद्र पांडुरंग सुर्वे हे दि. २७/०५/१९९९ रोजी मौजे तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १६/१२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे वडील कै. रामचंद्र पांडुरंग सुर्वे हे दि. २७/०५/१९९९ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. प्रकाश रामचंद्र सुर्वे यांचे वडील कै. रामचंद्र पांडुरंग सुर्वे हे दि. २७/०५/१९९९ रोजी मौजे तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता. : २७/१२ /२०२४

**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु., ता. माणगांव, जि. रायगड. जाहीर निविदा

**नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.२७/१२/२०२४**

ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु. यांचेकडील ग्रा.पं.फंड सन २०२४/२५ अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामांचे नांव | योजनेचे नाव | अंदाजीत रक्कम (रु.) | निविदा फी (रु) | इसारा फी (रु.) | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंब्रेवाडी येथे दगडू सालेकर यांचे घरापासून संदिप येरुणकर यांचे घरापर्यंत रस्ता तयार करणे. | ग्रा. पं. फंड २०२४/२५ | २,००,०००/- | २००/- | २०००/- | ०३/०१/२०२५ | ०४/०१/२०२५ | ६ महिने |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि.०३/०१/२०२५ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/ पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा.उपअभियंता (बांधकाम) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा.सरपंच ग्रा.पं. पळसगाव बु.यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

सही/-
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु., ता. माणगांव, जि. रायगड.**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु., ता. माणगांव, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल विमल धर्माजी ठाकूर (मालती मधुकर नाईक) मयततर्फे वारस १) भारती मधुकर नाईक उर्फ भारती दिपक म्हात्रे रा. ए. ३०४, वरळी गोपचार, सिटी बेकरी समोर, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी मुंबई- ४०० ०१८.
२) रश्मिकांत मधुकर नाईक रा.मु.पो. सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड
३) ज्योती मधुकर नाईक उर्फ ज्योती चंद्रकांत म्हात्रे, रा.मु. बामणोली, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड
४) शशिकांत मधुकर नाईक रा.मु.पो.सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड
५) स्वाती मधुकर नाईक उर्फ स्वाती विजय म्हात्रे रा.मु.भाग, पो. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड
६) निशिकांत मधुकर नाईक रा. ३९/३ पद्मावती अपार्टमेंट, ए विंग, ग्राऊंड फ्लोअर, परेल व्हिलेज, मुंबई- ४०००१२

आमचे अशिलाचे आजोबा धर्माजी महादेव ठाकूर यांना दोन मुले होती १) दत्तात्रेय धर्माजी ठाकूर व २) विमल धर्माजी ठाकूर उर्फ मालती मधुकर ठाकूर आमच्या अशिलांच्या व वनिता दत्तात्रेय ठाकूर उर्फ (योजना राम (पाटील)काठे), वत्सला दत्तात्रेय ठाकूर उर्फ (संध्या कमळाकर नाईक), मोहन दत्तात्रेय ठाकूर मयततर्फे वारस मीनल मोहन ठाकूर, मानसी श्रेयस पाटील, महती मोहन ठाकूर, चंद्रकांत दत्तात्रेय ठाकूर, निलम दत्तात्रेय ठाकूर उर्फ (श्रीया गणेश पाटील ) यांच्या एकत्रित मालकीच्या खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | ३२७ | ०.३४.२० ०.०३.३० | १०.११ |
| | एकूण | ०.३७.५० | |

सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा १/२ हिस्सा होता व आहे असे असतानाही वनिता दत्तात्रेय ठाकूर उर्फ (योजना राम पाटील) काठे, वत्सला दत्तात्रेय ठाकूर उर्फ (संध्या कमळाकर नाईक), मोहन दत्तात्रेय ठाकूर, मयततर्फे वारस मिनल मोहन ठाकूर, मानसी श्रेयस पाटील, महती मोहन ठाकूर, चंद्रकांत दत्तात्रेय ठाकूर, निलम दत्तात्रेय ठाकूर उर्फ (श्रीशा गणेश पाटील) इ. लोक आमचे अशिलांचे उपरोक्त सदर मिळकतीबाबत साठेकरार, समजुतीचा करार, खरेदीखत व अन्य दस्त करण्याची दाट शक्यता आहे. तशा प्रकारचा कोणताही दस्त कोणीही करु नये. तो व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक नसेल.

तरी, या जाहीर नोटीशीने सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत आमचे अशिलाखेरीज अन्य कोणीही कोणत्याही प्रकारचा साठेकरार, खरेदीखत, बक्षीसपत्र, दान, गहाण, लीज, समजुतीचा करार वा अन्य कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार करु नये. याउपरही सदर मिळकतीबाबत अशा स्वरुपाचा व्यवहार केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर होईल व याबाबत आमचे अशील व्यवहार करणाऱ्या कंपनी, संस्था, इसमांविरूद्ध वा अन्य कोणाही विरुद्ध कायदेशीर कारवाई करतील व त्याचे होणारे परिणामास सर्वस्वी व्यवहार करणारे हेच जबाबदार असतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. २८-१२-२०२४

सही/-
**अशिलातर्फे ॲड. जी.जी.गोंधळी**
**गोंधळी निवास, शॉप नं. १०२.**
**अंकूर ड्रायफ्रूटस्च्यासमोर, अलिबाग, रायगड**
**फोन नं. ९९२२७१६७८७/८१४९९९७०७७**

## जाहीर नोटीस

दिनांक : २८ डिसेंबर २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - कुंडलज, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| कविता मारूती हजारे | ५३ | ८ | ०-१३-०० | ० | १५ |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २८/१२/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

दिनांक : २८ डिसेंबर २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिल वर्षाराणी धनाजी टिळे रा.निळकंठ धारा, सी.एच.एस.प्लॉट नं.८, ९ बालभारती सेक्टर १२ जवळ खांदा कॉलनी, पनवेल वेस्ट, महाराष्ट्र ४१०२०६. यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे कुरूंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| संजय गजानन म्हसे | ३१ | ३ अ | ०-९०-० | ०-३५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :-२८/१२/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चौल, ता.अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक विलास गजानन पवार व माधुरी विलास पवार दोघे रा.२५०१ अखुद एसीएनई ओझोन, जी बी रोड स्वेवरा सर्कल, ठाणे ४००६०७ यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे आशिलांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग जि. रायगड | २५४१ | ०-७४-८० पो.ख.०-००-८० एकुण क्षेत्र ०-७५-६० | ४३.४४ |

वर नमुद बागायत मिळकतींपैकी विलास गजानन पवार व माधुरी विलास पवार यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-४०-०० हे. आर मिळकत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २८/१२/२०२४

सही /
**ॲड. सोनाली कल्पेश गुरव**
रा. मु. पो. सासवने
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबाईल नं. ९२६०२३४३१२

# पर्यटक, स्थानिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस सज्ज



## जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी राहणार पोलिसांचा पहारा

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**सरत्या २०२४ या वर्षाला निरोप देण्यासाठी तसेच २०२५ या नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्ह्यात पर्यटक येऊ लागले आहेत. स्थानिक व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलीस सज्ज आहेत. जिल्ह्यात ८७४ पोलिस कर्मचाऱ्यांसह १०९ पोलीस अधिकारी व शंभरहून अधिक होमगार्डचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच, दोन आरसीपी पथकाचीदेखील मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांचा पहारा ठेवला जाणार आहे.**

गेल्या दोन दिवसांपासून पर्यटकांनी जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळांवर मुक्काम ठोकण्यास सुरुवात केली आहे. जानेवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत विविध हॉटेल बुक झाली आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या हॉटेल, रेस्टारंट, रिसॉर्टमध्ये नाईट पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. वेगवेगळ्या खाद्य पदार्थांवर वेगवेगळ्या सवलती ठेवण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील वेगवेगळ्या दारुच्या दुकानांमध्ये मद्य खरेदीला सुरुवातदेखील सुरु झाली आहे. काही दारुच्या दुकानांमध्ये दारु खरेदीवर





सवलतही देण्यात आली आहे. मद्याचे पेले रिचवत आणि गाण्याच्या ठेक्यावर नाचत पर्यटक धमाल करण्यासाठी सज्ज झाले आहेत. अलिबाग, वरसोली, आक्षी, नागाव, किहीम, काशीद, मुरुड, दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन येथील समुद्र किनारी पर्यटक दाखल झाल्याने हॉटेल, रिसॉर्ट, कॉजेट, लॉजींग, पर्यटनावर आधारित असणाऱ्या छोट्या-मोठ्या व्यावसायिकांची चंगळ होत असल्याचे चित्र आहे. त्यामध्ये स्थानिकांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी जिल्ह्यात पर्यटक दाखल झाले आहेत. हा आनंद साजरा करताना विरजन पडू नये, यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली आहे. पर्यटक स्थानिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. जिल्ह्यात १ हजार १७७ पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये शंभर होमगार्ड, दोन आरसीपी पथक, १०९ पोलीस अधिकारी व ८७४ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### सायबर सेलचे राहणार लक्ष

मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात होत असताना सोशल मिडीयादेखील वापर होत आहे. नववर्षाच्या निमित्ताने जिल्ह्यात स्थानिकांसह पर्यटकांची प्रचंड गर्दी होणार आहे. समाजमाध्यमांवर कोणीही व्हीडीओ, छायाचित्र, ऑडीओ क्लीपद्वारे अक्षेपार्ह मेसेज टाकून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी सायबर सेलची मदत घेतील जाणार आहे. सोशल मिडीयावर काही अक्षेपार्ह मेसेज, व्हीडीओ टाकणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### ड्रोनद्वारे सोडवणार वाहतूक कोंडीचा प्रश्न

सरत्या वर्षाला निरोप देण्याबरोबरच नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटक जिल्ह्यात येऊ लागले आहेत. स्थानिकांसह पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून पावले उचलण्यात आली असून पर्यटकांचा प्रवास सुखकर व्हावा. त्यांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेवर पोहचता यावे, यासाठी जिल्ह्यातील मुख्य रस्त्यांबरोबरच वाहतूक कोंडी होणाऱ्या रस्त्यावर वाहतूक पोलीस तैनात केले आहेत. एकूण ९२ पोलीस अंमलदार वाहतूक कोंडी सुरळीत करण्याचा प्रयत्न करणार आहेत. यावेळी ड्रोन कॅमेराचीदेखील मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यातील अलिबाग रिलायन्स बायपास, पोयनाड ते पेझारी नाका, माणगाव मुख्य बाजारपेठ, येथे वाहतूक नियोजनासाठी ड्रोन कॅमेरांद्वारे लक्ष ठेवून वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविला जाईल.

### मद्यधुंद चालकांनो सावधान

थर्टी फर्स्टच्या निमित्ताने जिल्ह्यातील दारुची दुकानांमध्ये खरेदीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळू लागला आहे. यादरम्यान, लाखोंची उलाढाल होण्याची शक्यता आहे. यावेळी, अनेकजण दारु पिऊन वाहन चालवत असतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. हे रोखण्यासाठी वाहतूक रायगड पोलिसांमार्फत ब्रेथ अनालायझर द्वारे चालकांची तपासणी केली जाणार आहे. त्यामुळे, दारु पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर या यंत्राचे लक्ष राहणार आहे. दोषी ठरल्याय त्यावर कारवाई होणार आहे.

### कॅटर्ससह खाणावळींवर गर्दी

पर्यटकांना घरगुती पद्धतीच्या भोजनांचा आनंद घेता यावा यासाठी स्थानिक कॅटर्स, खाणावळी सज्ज झाल्या आहेत. मोदक, डाळ-भात, पुरणपोळी अशा शाकाहारी पदार्थांबरोबरच मटणवडे, कोंबडीवडे, तसेच ताज्या माशांपासून बनविलेले विविध पदार्थ अशा खास रुचकर आहारावर पर्यटकांना चांगलाच ताव मारता येणार आहे. जिल्ह्यात २ हजारहून अधिक हॉटेल, रेस्टॉरन्ट असून ते जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत फुल्ल असल्याचे व्यवसायिकांनी सांगितले आहे.

### जिल्हा प्रशासन सतर्क

रायगडच्या किनारपट्टीवर सध्या पर्यटकांची मांदीयाळी पहावयास मिळत आहे. येणाऱ्या पर्यटकांना कोणताही त्रास होऊ नये, तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नजर ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करुन नवीन वर्षाचे स्वागत करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### गैरकृत्यांवर राहणार नजर

रायगड पोलीस दलाच्या अखत्यारीत २८ पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. नवीन वर्षाच्या स्वागताच्या दृष्टीने जिल्ह्यात विशेष पथक तयार करण्यात आले आहेत. हॉटेल, ढाबे, कॉटेजेस व फार्महाऊस येथे होणाऱ्या गैरकृत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी या पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. दारु पिऊन धिंगाणा घालणे, दारु पिऊन वाहन चालविणे, गांजा तसेच इतर अंमली व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी जिल्ह्यातील महत्वाच्या ठिकाणी पोलीस पथके व पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

### महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथक

थर्टी फर्स्टच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यामध्ये पर्यटक दाखल झाले आहेत. लाखो पर्यटक या दिवशी जिल्ह्यात असणार आहेत. वेगवेगळ्या हॉटेल, कॉटेजेसबरोबरच मोकळ्या जागेत व समुद्रकिनारी पर्यटकांची अलोट गर्दी असणार आहे. नववर्षाच्या स्वागतादरम्यान महिलांच्या सुरक्षेसाठी कडक पावले उचलण्यात आली आहेत. गर्दीचा फायदा घेत महिलांचा धक्काबुक्की करणे व इतर काही गैरप्रकार घडू नये यासाठी पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांचे पथक साध्या गणवेशात राहणार आहे. अलिबाग, काशीद, नागाव, दिवेआगर, मुरूड, मांडवा, श्रीवर्धन या समुद्रकिनाऱ्यांबरोबरच शहरातील आणि तालुक्यातील मुख्य बाजारपेठांमध्ये साध्या गणवेशातील पोलिसांची नेमणूक करण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथक काम करणार आहेत.



# वाहतूक कोंडीने पर्यटकांचे बेहाल

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

नाताळची सुट्टी तसेच वर्षाअखेरची मौजमज्जासाठी समुद्र किनाऱ्याचा मनमुराद आस्वाद घेण्यासाठी प्रचंड संख्येने पर्यटक अलिबाग ते मुरूड पट्ट्यामध्ये हजेरी लावत आहेत. परंतु, पर्यटकांच्या वाढत्या वाहनांचा ताण अलिबाग ते रेवदंडा मुख्यः रस्तावर पडला असून या रस्तावर मिनिटागणीत वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. यामुळे वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांचे बेहाल झाले आहेत.

सध्या नाताळ, शनिवार-रविवारची सुट्टी तसेच आगामी सरते वर्ष यामुळे अलिबाग व मुरूड तालुक्यांत पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. यातच अलिबाग ते रेवदंडा मधून निघणारा रस्ता अरूंद व चिचोंळा तसेच वळणाचा आहे. या रस्ताने रेवदंडा, चौल, नागाव व मुरूड तालुक्यातील पर्यटनाकडे ये-जा करणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात रेलचेल वाढली आहे. वाढत्या वाहतुकीमुळे या रस्त्याला वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. तसेच, अलिबाग रेवदंडादरम्यान कुरूळ येथे वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्यातच शुक्रवारी सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्ता दुरूस्तीची कामे काढल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता.

# कर्जतमधील वीजपुरवठा बंद

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

महावितरण कंपनीच्या उपकेंद्रात तसेच शहरातील सडलेले आणि वाकलेले पोल बदलण्याच्या तांत्रिक कामाकरीता कंपनीने शुक्रवारी (दि.२७) आठ तासाचा बंद घेऊन काम सुरू केले होते. दरम्यान, खोपोली ते भिसेगाव उपकेंद्रापर्यंत असलेल्या इनमिंग लाईनवरील कंडक्टर बदलणे व त्याचे मजबुतीकरण करणे, उपकेंद्राच्या परिसरात असलेल्या झाडाच्या त्रासदायक फांद्या तोडणे, कर्जत शहरातील गंजलेले पोल आणि वाकलेले पोल बदलणे या तांत्रिक कामासाठी वीज वितरण कंपनीकडून बंद घेण्यात आला होता. याबाबतची पूर्वकल्पना सोशल मीडियावरून दिली होती.



# उरणमधील मुख्य रस्त्याचे कॉंक्रिटीकरण

**। उरण । वार्ताहर ।**

मुंबई शहराकडे जाणाऱ्या अटल सेतू, उलवे नोड, आणि रेल्वे स्टेशनला जोडणाऱ्या जासई नाका ते गव्हाण गाव या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली होती. यामुळे या मार्गावरून प्रवास करताना प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेत सार्वजनिक बांधकाम विभाग उरणचे उप अभियंता नरेश पवार यांनी कॉंक्रिटीकरण करण्याचे काम हाती घेतल्याने प्रवासी नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे.



मुंबई शहराकडे जाणाऱ्या अटल सेतू, उलवे नोड, आणि या ठिकाणावरील रेल्वे स्टेशनला जोडणाऱ्या जासई नाका ते गव्हाण गाव या मुख्य रस्त्यावर पावसाळ्यात मोठंमोठे खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली होती. यामुळे या मार्गावरून जाताना वाहनचालक व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत, शेकापचे युवा नेते रमाकांत म्हात्रे यांनी वारंवार संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. तसेच, रस्त्याचे रुंदीकरण व कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी देखील करण्यात आली होती.

त्या मागणीची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभाग उरणचे उप अभियंता नरेश पवार यांनी शासनाकडून निधी उपलब्ध करून घेतला.आणि के.एन. घरत या कंपनीच्या माध्यमातून या रस्त्याचे रुंदीकरण व कॉंक्रीटीकरण करण्याचे काम सुरू केले. हा रस्ता खड्डेमुक्त झाल्याने वाहनचालक व प्रवाशांनी समाधान व्यक्त करत या रस्त्याच्या कामासाठी पुढाकार घेणाऱ्याचे आभार व्यक्त केले आहेत.

# पीएनपी शाळेत मार्गदर्शन शिबीर




**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळ्यातील पाष्टी येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीची माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक सुदाम माळी यांच्या मार्गदर्शनाखाली येथील रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक शाखेच्या विद्यमाने डिजीटल साक्षरता अभियान तसेच बचत, विमा व बँक व्यवहार याविषयी मार्गदर्शन प्रशिक्षण शिबा संपन्न करण्यात आले.

यावेळी, पैसे वाचवणे व योग्य पद्धतीने बचत करणे म्हणजे पैशाला पैसा जोडणे या शब्दात रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा म्हसळाचे व्यवस्थापक मंगेश मुंडे यांनी शाळेतील पालकांचे व ग्रामस्थांचे उद्बोधन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना बँकेचे व्यवहार लेखी व कृतीसह शैक्षणिक कर्ज हे विषय समजावून सांगितले. तसेच, जमलेल्या शेतकरी, वृद्ध, महिला, भगिनी व ग्रामस्थांना बचत गट, आरडी, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना, बचत, कर्ज योजना, स्वयंरोजगार कर्ज योजना, विविध ठेवी योजना इत्यादी विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

हा उपक्रम व कार्यक्रम प्रभावीपणे पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सुदाम माळी, शिक्षक प्रफुल्ल पाटील, बिलाल शिकलगार, ललित पाटील, विनयकुमार सोनवणे, संदिप दिवेकर, चिराग शिर्के, रूची निवाते व विवेक मांढरे यांनी अथक प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी पाष्टी हायस्कूलचे शाळा समिती अध्यक्ष राजाराम धुमाळ, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष राजाराम दिवेकर, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकचे बँक व्यवस्थापक मंगेश मुंडे यांच्यासह विजय पयेर, संदेश पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कर्तव्या दुर्गवले, माजी सरपंच चंद्रकांत पवार, पोलिस पाटील स्नेहा पवार, प्रीती म्हशिलकर, ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.


## दस्तुरी नाका येथील प्रवेशद्वार सजवले

# नववर्षाच्या स्वागतासाठी माथेरान सजले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात सरत्या वर्षाला निरोप येणाऱ्या पर्यटकांची संख्या हजारांमध्ये असते. हे लक्षात घेऊन पर्यटकांची गैरसोय होऊ नये यासाठी पालिका प्रशासनाने योग्य नियोजन करण्यत येत आहे. तर, पर्यटकांचे स्वागत करण्यासाठी पालिकेने दस्तुरी नाका येथील प्रवेशद्वार सजवले आहे. दरम्यान, माथेरान शहरात गुलाबी थंडी अनुभवण्यासाठी हजारो पर्यटक हजेरी लावतील असा विश्वास पालिकेने व्यक्त केला आहे.

मुंबईपासून जवळ असलेल्या माथेरानमध्ये पर्यटक सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी हजारोंचे संख्येने गर्दी करत असतात. हे लक्षात घेऊन माथेरानमधील हॉटेल व्यवसायिकांपासून अगदी लहान व्यवसायिक या पर्यटन हंगामासाठी सज्ज झाला आहे. तसेच, हा हंगाम माथेरानमध्ये दरवर्षी जोरदार होत असल्याने माथेरान शहरात येणाऱ्या पर्यटकांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालिका प्रशासन सज्ज झाले आहे. यावेळी, माथेरान शहरात येणाऱ्या पर्यटकांचे स्वागत करण्यातही माथेरान पालिका आघाडीवर असून या पर्यटन स्थळाचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तूरी नाका येथे स्वागताचे मनोरे उभे करण्यात आले आहेत. प्रवेशद्वार रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांनी सज्ज झाले असून येथील रंगीबेरगी फुगे पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत.



तर, दुसरीकडे पुढील पाच ते सहा दिवस शहरातील कोणत्याही रस्त्यांवर कचरा साचून राहू नये म्हणून व पर्यटकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वच्छता व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांची वर्दळ शहरात दिसून येणार आहे. तसेच, शहरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेऊन पाणी पुरवठा योजना व्यवस्थित सुरू रहावी यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून नियोजन केले जात आहे. तर, नेरळ-माथेरान घाटरस्ता यामार्गे प्रवासी वाहतूक करणारे टॅक्सी संघटना यांनी देखील २४ तास सेवा देण्याचा निर्णय घेतला आहे. आणि पोलीस प्रशासनाकडून पार्किंग फुल्ल झाल्यावर घाटरस्ता वाहतूक कोंडीमध्ये अडकु नये यासाठी नेरळ पोलिसांचे सहकार्य घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.




**पाहिजेत**

**वामन हरी पेठे ज्वेलर्स अलिबाग शाखेसाठी पाहिजेत.**

**सेल्स एक्जिक्युटिव**
पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवीधर

**शिपाई**
पात्रता : SSC, अनुभव असल्यास प्राधान्य.

**प्रत्यक्ष भेटण्यासाठी रविवार दिनांक २९/१२/२०२४**
**वेळ : सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत.**

**संपर्क : (०२१४१)२२१४७७/९९६०५४२६१३**

# अबोल, सच्चा सुधारक

खऱ्या भांडवलशाहीला उत्तम दर्जाच्या लोकशाहीची गरज असते. संसद, न्यायालये, नोकरशाही या यंत्रणानी निःपक्षपणे व पारदर्शकपणे काम करणे हे तिच्यासाठी अत्यंत महत्वाचे असते. तसे झाले नाही तर स्पर्धा बंद होते, काही ठराविक कंपन्या व मालकांची मक्तेदारी तयार होते. आर्थिक दांडगटांचा गट सगळी व्यवस्था आणि सर्व देश ताब्यात घेतो. अशी परिस्थिती निर्माण न होऊ देणे ही सरकारची जबाबदारी असते. पण सरकार मालकांचे गुलाम होते. ते नोकरशाही व न्यायालयांना आपल्या म्हणण्याप्रमाणे वागायला लावते. यातून भांडवलशाहीच्या प्रगतीचे दरवाजे बंद होतात, जे आज देशात घडले आहे. आज सर्व महत्वाची कंत्राटे, कंपन्या, प्रकल्प अदानी नावाच्या बकासुराला अर्पण केल्या जात आहेत. याबाबत अमेरिकी यंत्रणांनी भ्रष्टाचाराचे आरोप करूनही मोदी सरकार काहीही कारवाई करीत नाही. मनमोहनसिंग यांनी पाच वर्षे अर्थमंत्री व दहा वर्षे पंतप्रधान असताना सरकारचे निर्णय निःपक्ष ठेवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला. डॉ. सिंग निखालसपणे भांडवली अर्थतज्ज्ञ होते. ते खऱ्या भांडवलशाहीच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणारे होते. त्यांनी या किंवा त्या कंपनीला अनुकूल निर्णय घेतला अशी टीका त्यांच्यावर कधी झाली नाही. वैयक्तिक आयुष्यात ते अत्यंत सज्जन, सालस, प्रामाणिक, मृदूभाषी होते. त्यांचे शत्रूदेखील त्यांच्यावर कधी भ्रष्टाचाराचा आरोप करू शकले नाहीत. शेवटपर्यंत मारुती ८०० ही कार ते वापरत. शिवाय देशातील महत्वाच्या पदांवर काम करताना त्यांनी बराच काळ केवळ एक रुपया मानधन घेऊन काम केले. लोकशाही मूल्ये जपण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. त्यामुळेच त्यांच्यावर २००९ नंतर टोकाची टीका होऊनही त्यांनी टीकाकारांवर कधीही विद्वेषाने कारवाई केली नाही. उलट टीकाकारांनी ज्यांच्याबाबत आरोप केले त्या कोळसा किंवा टूजी घोटाळ्यांबाबत स्वतःहून चौकशी जाहीर केली. या दोन्ही प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा कोणताही पुरावा गेल्या दहा वर्षात मोदी सरकारला सादर करता आलेला नाही.

## आदर्श शत्रू

हेच मनमोहनसिंग यांचे मोठेपण आहे. ते भांडवलशाहीसाठी काम करीत होते. अदानीसारख्या मूठभर भांडवलशहांसाठी नव्हे. डाव्या पक्षांना त्यांची धोरणे अमान्य होती. त्यांना ते वर्गशत्रू वाटत होते. तरीही सिंग यांच्याशी समोरासमोर लढणे सहज शक्य होते. कारण, ही लढाई लोकशाही चौकटीत होईल याची हमी होती. सिंग हे या चौकटीचे सर्व नियम काटेकोरपणे पाळणारे होते. संसदेतील विरोधकांना तुच्छ लेखणारे व तुरुंगात टाकणारे नव्हते. न्यायालयांचा सन्मान करणारे होते. नोकरशाही व वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देणारे होते. ज्या राजकीय अर्थव्यवस्थेत आपण वावरत आहोत त्याच्या मर्यादाही त्यांना ठाऊक होत्या. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना साठ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात आली. अनेक भांडवली तज्ज्ञांनी याबाबत टीका केली. खुद्द सिंग यांनाही हा निर्णय फार पसंत नसावा. तरीही त्यावेळची गरज म्हणून त्यांनी ते केले. उद्योगपतींची याहून कितीतरी अधिक कर्जे वेळोवेळी सरकार माफ करत असते, त्यामुळे हाही निर्णय अपरिहार्यच आहे या वास्तवाचे त्यांना भान होते. मात्र दुसऱ्या बाजूने वेळ आली तेव्हा सरकारचे अस्तित्व पणाला लावून त्यांनी अणुकरार करण्यासही मागेपुढे पाहिले नव्हते. अर्थात, हे ते १९९१ पासूनच करीत आले होते. त्यावेळी अर्थव्यवस्था दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होती. जेमतेम एक महिन्याची आयात करता येईल इतकेच परकीय चलन शिल्लक होते. ४७ टन सोने गहाण टाकून हे चलन मिळवावे लागले होते. कर्ज हवे असेल तर आमच्या अटी मान्य करा असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे म्हणणे होते. देशातील समाजवादी तोंडवळ्याच्या व्यवस्थेमध्ये एकाएकी भांडवली बदल आणणे सोपे नव्हते. ते सिंग यांनी केले. केवळ १८ उद्योग वगळता बाकी सर्वांमधून सरकारी परवान्याची अट काढून टाकण्यात आली. ३४ उद्योगांमध्ये सरकारी संमतीशिवाय थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. रुपयाचे अवमूल्यन करून निर्यात स्वस्त करण्यात आली. आयातीला मुक्त वाव मिळाला.

## सामान्यांसाठी अनेक कायदे

सिंग यांच्या या धोरणांमुळेच भारताने पुढील तीस वर्षात वेगाने प्रगती केली. आयटी सेवा, औषध उद्योग इत्यादींमध्ये भारत आज पूर्ण जगात एक ताकद म्हणून ओळखला जातो. त्याचे श्रेय सिंग यांच्या सुधारणांना जाते. वीजनिर्मिती, मोबाईल व टेलिकॉम, टीव्ही व मनोरंजन या क्षेत्रांची भरभराट व जी प्रचंड रोजगारनिर्मिती झाली तिची मुळेदेखील सिंग यांच्या त्या धोरणांमध्येच आहेत. सिंग यांनी अर्थव्यवस्था खुली करताना या कंपन्यांना नियंत्रित करण्यासाठी पुरेशा व्यवस्था उभारल्या नाहीत असा आक्षेप नक्की घेता येईल. त्यातून मोबाईल कंपन्यांचे क्षेत्र किंवा शेअर बाजारातील गुंतवणूक यामध्ये अनेक भानगडी झाल्या. पण सिंग यांनी त्यांना पाठीशी घातले नाही वा त्यांचे नरेंद्र मोदींप्रमाणे निर्ल्लज्ज समर्थनही केले नाही. सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात सामान्य माणसाच्या हिताच्या अनेक उपाययोजनाही अमलात आल्या. मनरेगासारखी रोजगाराची हमी, अन्नसुरक्षा कायद्याद्वारे रेशनवरील धान्याची हमी इत्यादींचा यात समावेश होतो. सरकारबाहेरून सोनिया गांधींचा त्यांच्यावर त्यासाठी दबाव होता अशी टीका केली जाते. पण ती चुकीची आहे. समाजातील विषमतेच्या आपण विरोधात आहोत हे सिंग यांनी अनेकवार स्पष्ट केले होते व त्यासाठी ही धोरणे आवश्यक होती अशी त्यांची स्वतःचीही धारणा होती. त्यांच्याच काळात माहितीचा कायदा अमलात आला. याचाच फायदा घेऊन विरोधकांनी नंतर त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. अण्णा हजारे यांचे एक मतलबी आंदोलनही यातून उभे राहिले. पण सिंग आपल्या धोरणापासून हटले नाहीत. आता आपल्यावर टीका होत असली तरी भविष्यात आपले योग्य मूल्यमापन होईल अशी त्यांना खात्री होती. आधार कार्डासारख्या सिंग यांच्या असंख्य योजनांवर स्वतःचा शिक्का मारून विकण्याचा भुरटेपणा करून मोदींनी गेल्या दहा वर्षात ती अनेकदा सार्थ ठरवली आहे. देशाला प्रगतीची नवी दिशा दाखवून देणाऱ्या या अबोल आणि सच्च्या सुधारकाला अभिवादन.

---

विचार

# आर्थिक सुधारणांचा किमयागार

***कठीण परिस्थितीतून संघर्ष करून पुढे येणारे कोणत्याही संकटावर मात करू शकतात. डॉ. मनमोहन सिंग यांच्या बाबतीत हा अनुभव येतो. अनेकविध पदे त्यांच्याकडे चालत आली; परंतु १९९१ मध्ये अर्थमंत्रिपद स्वीकारल्यानंतर त्यांनी लागू केलेले आर्थिक धोरण आजतागायत कोणालाही बदलता आले नाही. ते दूरदृष्टीचे नेते, अर्थतज्ज्ञ होते. त्यांच्यामुळे देशाला आर्थिक विकासाचा मार्ग सापडला.***

**उल्हास पवार**

माजी पंतप्रधान आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ.मनमोहन सिंग यांनी अखेरचा निरोप घेतला. गेल्या काही वर्षांपासून ते सक्रिय राजकारणात नव्हते; परंतु लोकसभेच्या निवडणुकीच्या काळात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धार्मिक ध्रुवीकरणावरून उत्तर दिले होते. डॉ. सिंग यांनी प्रथम आर्थिक सल्लागार म्हणून देशाची सेवा केली आणि त्यानंतर देशाचे अर्थमंत्री आणि पंतप्रधानही झाले. त्यांनी १९९१ च्या आर्थिक संकटातून भारताला बाहेर काढले. त्यांचे सुरुवातीचे आयुष्य संघर्षमय होते. त्यांना पैशाच्या कमतरतेचा सामना करावा लागला. संघर्षाच्या दिवसांमध्येही त्यांनी कठोर परिश्रम सोडले नाहीत आणि समर्पणवृत्तीने स्वत:चा ठसा उमटवत राहिले. २००४ च्या लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीपर्यंत अटलबिहारी वाजपेयी सरकार निवडणुकीत पराभूत होऊ शकते, याची कुणालाही कल्पना नव्हती. सर्व निवडणूक विश्लेषक 'एनडीए' सरकारच्या पुनरागमनाचा दावा करत होते. मतमोजणीच्या सुरुवातीच्या ट्रेंडमध्ये भाजप पिछाडीवर पडल्याने हे सुरुवातीचे कल असल्याचे सांगत होते. भाजप नक्कीच पुनरागमन करेल, असे सांगितले जात होते; पण तसे झाले नाही. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीने निवडणुका जिंकल्या. त्यानंतर सोनिया गांधी आता पंतप्रधान होतील, असे मानले जात होते. तथापि, १९९८ मध्ये सोनिया यांनी राजकारणात प्रवेश करताच शरद पवार, तारिक अन्वर आणि पी. ए. संगमा यासारख्या नेत्यांनी सोनिया यांच्या परदेशी मूळाच्या मुद्द्यावरून पक्ष सोडला आणि १० जून १९९९ रोजी नवीन पक्षाची स्थापना केली, तरीही संख्याबळ 'यूपीए'च्या बाजूने असल्याने आणि शरद पवारांपासून लालू प्रसाद यादवांपर्यंत सर्वच जण सोनिया पंतप्रधान झाल्याबद्दल दावे करत असल्याने या विजयानंतर परदेशी मुळाचा मुद्दा संपुष्टात आल्याचे दिसत होते.

या टप्प्यावर भाजपचे बहुतांश नेतेही गप्प बसले होते; परंतु सुषमा स्वराज आणि उमा भारती यांनी सोनिया यांच्या विदेशी मूळचा मुद्दा तापवला. स्वराज यांनी तर सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यास मुंडन करण्याचा इशारा दिला होता. हे प्रकरण पुन्हा चांगलेच तापले. नटवर सिंह यांच्या म्हणण्यानुसार, राहुल यांनी सोनिया यांना आपली विनंती मान्य करण्यासाठी २४ तासांचा अवधी दिला होता. पंतप्रधानपद स्वीकारले, तर कोणत्याही थराला जाऊ अशी धमकी दिली. राहुल यांच्या हट्टीपणामुळे सोनिया यांना पंतप्रधानपद नाकारण्यास भाग पाडले होते. नीरजा चौधरी यांनी त्यांच्या 'हाऊ प्राईम मिनिस्टर डिसाईड' या पुस्तकात लिहिले आहे की, या घटनेनंतर काही दिवसांनी नटवर सिंह यांच्याशिवाय विश्वनाथ प्रताप सिंह यांनीही त्यांना सांगितले होते, की सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपद स्वीकारावे, असे त्यांच्या मुलांना वाटत नव्हते. कारण, पंतप्रधानपद स्वीकारले तर त्यांचे जीवन धोक्यात येण्याची भीती वाटत होती. विश्वनाथ प्रताप सिंह हे सोनिया गांधींच्या सरकार स्थापन करण्याच्या बाजूने होते. नीरजा चौधरी ते सोमनाथ चटर्जी यांनीही विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या विधानाला दुजोरा दिला. विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या जवळचे असलेले संतोष भारतीय यांनी त्यांच्या 'विश्वनाथ प्रताप सिंह, चंद्रशेखर, सोनिया गांधी आणि मी' या पुस्तकातही या घटनेचा उल्लेख केला आहे.



या सर्व काळात डॉ. सिंग हे शांत होते. त्यांना आपण पंतप्रधान होऊ, असे स्वप्नातही वाटले नव्हते; परंतु त्यांनी नरसिंह राव यांच्या काळात देशाला दिलेली दिशा, त्यांची निष्ठा पाहून काँग्रेसने त्यांच्या गळ्यात पंतप्रधानपदाची माळ घातली. त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवूनच सोनिया यांनी हा निर्णय घेतला. एकाच वेळी भाजपच्या 'व्हिसल ब्लोअर'चा आवाज बंद करणे आणि एका नोकरशहाच्या हाती देशाची सूत्रे देऊन त्यांच्या हाताखाली अन्य नेत्यांना काम करायला लावणे हा उद्देश होता. डॉ. सिंग हे देशातील आर्थिक सुधारणांचे जनक आहेत. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली भारतातील मोठ्या आर्थिक सुधारणांचे जनक मानले जाते. त्यांनी १९९१ मध्ये आर्थिक उदारीकरणाचे युग सुरू केले. या निर्णयामुळे 'लायसन्स राज'चे युग संपुष्टात आले. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणाचा पाया त्यांनी घातला. त्यांचा १९९१ चा उदारीकरणाचा अर्थसंकल्प अभूतपूर्व मानला जातो. यामुळे आर्थिक सुधारणांच्या नव्या युगाची सुरुवात झाली. या दूरदर्शी पावलाने देशात क्रांती घडवून आणली आणि लाखो लोकांना गरिबीतून बाहेर काढले आणि १९९१ च्या अर्थसंकल्पाने भारताच्या विकासाला चालना दिली.

नवीन औद्योगिक धोरणाची सुरुवात झाली. मनमोहनजींनी भारताच्या आर्थिक परिवर्तनाला प्रेरणा दिली. या अर्थसंकल्पात सिंग यांनी परदेशी कंपन्यांना देशात व्यवसाय स्थापन करण्यासाठी प्रवेश दिला. अनेक नियमही बदलण्यात आले. १९९१ ला ऐतिहासिक अर्थसंकल्पाचे वर्षदेखील म्हटले जाते. कारण या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढवण्याचे काम करण्यात आले. डॉ. सिंग यांनी या अर्थसंकल्पात परवानाधारक राज संपवून आर्थिक उदारीकरणाचे युग सुरू केले. त्यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणांनी कंपनी कायदा आणि व्यापार व्यवहार कायदा (एमआरटीपी) यासह अनेक कायद्यांमध्ये सुधारणा करून ते सहज, सोपे केले.

१९९१ मध्ये परकीय चलन राखीव संकटाचा सामना करत, नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या तीन परिवर्तनकारी आर्थिक सुधारणा सादर केल्या. महाराष्ट्राची रोजगार हमी योजना देशपातशीवर स्वीकारून मनरेगाच्या माध्यमातून गरिबांना रोजगार दिला. त्यांच्या या योजनेवर अनेकांनी टीका केली; परंतु टिकाकारांना नंतर या योजनेचे महत्त्व पटले. गेल्या दहा वर्षांमध्ये त्यांना ही योजना बंद करता आली नाही. डॉ. सिंग पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांनी गरीब आणि ग्रामीण भारताच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. २००५ मध्ये त्यांनी 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' लागू केला. या योजनेंतर्गत ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला वर्षातून किमान शंभर दिवस मजुरीची हमी देण्यात आली होती. सरकार १०० दिवस काम देऊ शकत नसेल, तर बेरोजगारी भत्ता द्यावा लागला. या योजनेमुळे ग्रामीण भागातील गरिबी कमी झाली आणि लोकांचे शहरांकडे होणारे स्थलांतरही कमी झाले. नंतर या योजनेचे नाव बदलून 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' (मनरेगा) करण्यात आले. ही योजना आजही ग्रामीण भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

डॉ. सिंग यांच्या सरकारने २००५ मध्ये देशात पहिल्यांदा माहिती अधिकार कायदा (आरटीआय) लागू केला. त्यांच्या सरकारने आणलेले हे कायदे सर्वसामान्यांसाठी निर्णायक ठरले. या कायद्याने सामान्य माणसाला अधिकार दिले होते. या कायद्यानुसार भारतातील कोणताही नागरिक कोणत्याही सरकारी विभागाकडून माहिती मागू शकतो. यामुळे सरकारी कामात पारदर्शकता आली आणि भ्रष्टाचार कमी झाला. आता आपल्या कामावर जनता लक्ष ठेवून आहे, असे सरकारी अधिकाऱ्यांना कळल्याने ते पूर्वीपेक्षा अधिक जबाबदारीने काम करू लागले. बराक ओबामा यांच्यासोबत अमेरिकेशी अणुकरार करून डॉ. सिंग यांनी देशाला अधिक शक्तिशाली बनवले. डाव्यांचा विरोध असतानाही २००८ मध्ये अमेरिकेसोबत ऐतिहासिक 'अण्वस्त्र करार' केला. या कराराला '१२३ करार' असेही म्हणतात. या करारांतर्गत भारताला आपल्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आण्विक तंत्रज्ञान आणि इंधन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला होता, तरीही हा करार झाला नाही. डॉ. सिंग यांचे हे राजनैतिक यश होते. या करारामुळे जगात भारताचा लौकिक वाढला आणि देश एक जबाबदार अणुशक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला. या करारामुळे भारताच्या विकासाला नवी चालना मिळाली.

भारताला आर्थिक संकटातून बाहेर काढणारे, गरिबांचे सक्षमीकरण करणारे, प्रशासनात पारदर्शकता आणणारे आणि जगात भारताचा दर्जा वाढवणारे दूरदर्शी नेते म्हणून उणीव नेहमीच जाणवत राहील. भ्रष्टाचार, निर्णयाला अर्धांगवायू झाल्याची टीका करणाऱ्या मोदी यांनी ८ फेब्रुवारी २०२४ राज्यसभेत सिंग यांचे कौतुक केले आणि 'प्रेरणादायी उदाहरण' मानले आणि सांगितले की लोकशाहीवर चर्चा होईल तेव्हा राज्यसभेच्या निवृत्त सदस्यांच्या निरोपाच्या निमित्ताने त्यांचे योगदान लक्षात ठेवले जाईल. त्यामुळे केंद्र सरकारच्या विरोधात काँग्रेसने जारी केलेल्या 'ब्लॅक पेपर'चेही त्यांनी स्वागत केले आणि विरोधी पक्षावर ताशेरे ओढताना देशाच्या समृद्धीला बाधा पोहोचू नये यासाठी 'ब्लॅक पेपर' आवश्यक असल्याचे सांगितले. मोदी म्हणाले की, वैचारिक मतभेदांमुळे कधी कधी वादविवादाच्या वेळी भांडणे होतात; पण ती फारच अल्पकाळ टिकतात. हे उद्गारच डॉ. सिंग यांचे महत्त्व अधोरेखित करतात.

---

आजकाल

# सोयाबीन शेतकऱ्यांची फसवणूक

**धनंजय सानप**

राज्यात यंदा सोयाबीनची सरकारी खरेदी 'रेकॉर्ड ब्रेक' करण्यात आली. एकूण ५८६ सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले. त्यामध्ये नाफेडच्या ४१७ आणि एनसीसीएफच्या १६९ खरेदी केंद्राचा समावेश आहे. या खरेदी केंद्राच्या मार्फत महाराष्ट्रात १ लाख ८९ हजार ४४९ टन सोयाबीन खरेदी करण्यात आली, असा दावा राज्यपालांच्या अभिभाषणावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गुरुवारी विधानसभेत केला. परंतु मुख्यमंत्री फडणवीसांच्या कथनी आणि करणीतला फरक आकडेवारी पाहिली की उघड होतो.

सोयाबीनचे भाव यंदा निच्चांकी पातळीला पोहचलेत. सोयाबीनची किमान आधारभूत किंमत म्हणजे हमीभाव २०२४-२५ च्या खरीप हंगामासाठी प्रतिक्विंटल ४ हजार ८९२ रुपये जाहीर करण्यात आला. यंदा मात्र ऐन आवकेच्या हंगामापासून सोयाबीनचे दर हमीभावाच्या खाली आहेत. सध्याही सोयाबीनला खुल्या बाजारात सरासरी ४ हजार ते ४ हजार २०० रुपये दर मिळतोय. म्हणजेच शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा किमान प्रतिक्विंटल ७०० ते ८०० रुपये कमी दरात सोयाबीन विकावं लागतय. याचा दुसरा अर्थ यंदा सोयाबीनचे भाव हमीभावाच्या तुलेनेत जवळपास २० टक्क्यांनी पडले आहेत.

लोकसभा निवडणुकीसारखाच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत सोयाबीनचा मुद्दा अंगलट येईल, अशी चिन्हं दिसू लागली होती, तसेच मध्यप्रदेश, राजस्थान या राज्यात सोयाबीनच्या पडलेल्या दरामुळे शेतकऱ्यांचे आंदोलन उभी राहिली होती. त्यामुळे केंद्र सरकारने सोयाबीनच्या सरकारी खरेदीचा निर्णय घेतला. पण प्रत्यक्ष खरेदी करण्यात केंद्र/राज्य सरकारला स्वारस्य नाही, असं चित्र सुरुवातीपासूनच पाहायला मिळालं.

महाराष्ट्रात खरीप हंगामात सोयाबीनचं सुमारे ५२ लाख टन उत्पादन झालं. केंद्र सरकारने महाराष्ट्रात १४ लाख १३ हजार टन सोयाबीन खरेदीचं उद्दिष्ट ठेवलं. १५ ऑक्टोबर २०२४ ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान खरेदीचा कालावधी आहे. सोयाबीन खरेदीची अंतिम मुदत १२ जानेवारी आहे. म्हणजे आजपासून अंतिम मुदतीला केवळ २४ दिवस बाकी आहेत. आणि आत्तापर्यंतची एकूण सरकारी खरेदी किती झाली तर १ लाख ८९ हजार ४५० टन. म्हणजे खरेदी उद्दिष्टाच्या १३.४० टक्के. तर एकूण उत्पादनाच्या केवळ ३.६४ टक्के. परंतु मुख्यमंत्री फडणवीस मात्र 'रेकॉर्ड ब्रेक' सोयाबीन खरेदी सांगून शेखी मिरवत आहेत. मुळात सोयाबीन खरेदी हे लबाडा घरचं आवतण ठरतं, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. त्यामुळे भावांतर योजना राबवा, अशी शेतकऱ्यांनी मागणी केलेली. परंतु त्याऐवजी सरकारी खरेदीचा घाट घालण्यात आला.

राज्यात सोयाबीन खरेदीची तारीख १५ ऑक्टोबर असूनही प्रत्यक्ष खरेदी दोन आठवडे उशिरा सुरुवात करण्यात आली. तर सुरुवातीपासून काही ठिकाणी खरेदी केंद्र सुरू करण्यात आली नाही. काही ठिकाणी हमीभाव खरेदी केंद्र सुरू केली गेली, परंतु तिथे बारदाना उपलब्ध नव्हता, तसेच नुकताच पाऊस काळ संपल्याने सोयाबीनमध्ये ओलाव्याचं प्रमाण १२ टक्क्यांपेक्षा अधिक होतं. त्यामुळे सोयाबीन खरेदी केंद्रचालक खरेदी करत नव्हते. सरकारी केंद्रावर सोयाबीन विक्रीसाठी घेऊन गेलेल्या शेतकऱ्यांना विक्री न करता, सोयाबीन परत घेऊन जावं लागलं, असेही अनुभव शेतकरी सांगतात. बहुतांश शेतकऱ्यांना मात्र दिवाळीच्या सणामुळं खुल्या बाजारात हमीभावाच्या कमी दरात सोयाबीन विकावं लागलं. त्याचा आर्थिक फटका बसला.

विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी प्रचारसभेत



सोयाबीनच्या १२ टक्के ओलाव्याचा निकष १५ टक्के केल्याची घोषणा केली. परंतु वास्तवात खरेदी मात्र १२ टक्के ओलाव्याच्या निकषाप्रमाणेच सुरू राहिली. आजही बहुतांश खरेदी केंद्रचालक १२ टक्के ओलावा असलेलं सोयाबीन खरेदी करत नाहीत, याकडे बुधवारी विधानसभेत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना धाराशिवचे आमदार कैलास पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचं लक्ष वेधलं. त्यावर अशा खरेदी केंद्र चालकांची नावं द्या, त्यांच्यावर कारवाई करू, असं म्हणत फडणवीसांनी विषय मिटवला.

खरं म्हणजे मुख्यमंत्री फडणवीसांनी प्रचारसभेत आणि महायुतीच्या जाहीरनाम्यातही सोयाबीनला ६ हजार रुपये दर, भावांतर योजना राबवण्याचा शब्द दिलेला. त्यावर मात्र फडणवीसांनी मुख्यमंत्री झाल्यापासून अवाक्षर काढलं नाही. त्याउलट अत्यल्प प्रमाणात केलेल्या सोयाबीन खरेदीला 'रेकॉर्ड ब्रेक'चा मुलामा चढवून मुख्यमंत्री फडणवीस मात्र पाठ थोपटून घेत आहेत. **(साभार)**

---

लोकसंसद

## एका थोर भारतीय अर्थतज्ज्ञाची अखेर

भारताचे १४ वे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने भारतीय अर्थव्यवस्थेला सुदृढ, सक्षम, समृद्ध आणि विकसित करून एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या एका शांत, सोज्वळ व्यक्तिमत्व असलेल्या थोर भारतीय अर्थतज्ज्ञाची अखेर झाली आहे. १९९१ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री असताना त्यांनी घेतलेल्या उदारीकरणाच्या निर्णयामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा चेहरामोहराच बदलून गेला. त्यांच्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाने कोट्यवधी भारतीयांकडे आर्थिक सुबत्ता आली. २६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील गाह नावाच्या एका गावात मनमोहन सिंग यांचा जन्म झाला होता. अत्यंत बुद्धिमान असलेल्या मनमोहन सिंग यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून (१९५७) आणि ऑक्सफोर्ड विद्यापीठातून (१९६२) अर्थशास्त्र या विषयात पदव्युत्तर पदव्या प्राप्त केल्या. नंतर काळाच्या ओघात विनम्र स्वभाव, अफाट कष्ट आणि कुशाग्र बुद्धीच्या जोरावर त्यांची भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, केंद्रीय अर्थमंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, देशाचे अर्थमंत्री आणि अखेर पंतप्रधान अशा चढत्या क्रमाने राजकीय कारकीर्द बहरत गेली. २००४ ते २००९ असे सलग दोन वेळा पंतप्रधान पद भूषविणारे डॉ. मनमोहन सिंग हे पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि नरेंद्र मोदी यांच्यानंतर सर्वाधिक काळ पंतप्रधान पद सांभाळणारे ४ थे पंतप्रधान ठरले आहेत. त्यांना भावपूर्ण आदरांजली!

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

---

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**२८ डिसेंबर**

**१८९७ : -** व्यासंगी संशोधक, प्राचीन साहित्याभ्यासक शंकर दामोदर पेंडसे यांचा जन्म. त्यांनी लिहिलेला कर्मयोग की कर्म संन्यास या लेखाला खुद्द लोकमान्य टिळकांनी दाद दिली. श्री ज्ञानेश्वरांची तत्त्वज्ञान या ग्रंथातून त्यांनी ज्ञानेश्वरांच्या तत्त्व-ज्ञानाची शंकराचार्य, योगवाशिष्ठ, नागपंथ आणि काश्मिरी शैव या अद्वैत संप्रदायाची तुलना करून त्याचे स्वरूप निश्चित केले. याखेरीस त्यांनी ज्ञानेश्वरांचा अभ्यास, वैदिक वाङ्मयातील भागवत धर्माचा विकास, पौराणिक भागवत धर्म महाराष्ट्राचा भागवत धर्म महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, ज्ञानदेव आणि नामदेव समर्थ रामदास हे त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ होय. **१८९९:-** कादंबरीकार, समीक्षक व 'तरुण भारत' चे माजी संपादक गजानन त्र्यंबकू मांडखोलकर (भाऊसाहेब) यांचा जन्म. 'आधुनिक कविपंचक (समीक्षा), 'मुक्तात्मा', 'शाप', 'डाकबंगला' (कादंबऱ्या), हे त्यांचे ग्रंथ तसेच आत्मपर आणि व्यक्तिविषयक लेखांची पुस्तके प्रकाशित झाली. **१९०३:-** पोवाडेकार पांडुरंग दत्तात्रय खाडिलकर यांचा जन्म. 'संभाजी महाराज', 'झाशीची राणी', 'स्वा.सावरकर', 'नेताजी सुभाषचंद्र बोस' यांच्यावर त्यांनी रचलेले पोवाडे गाजले. **१९०७ :-** नाटककार विठ्ठल नारायण कोठीवाले यांचा जन्म. 'आनंदविलास संगीत मंडळी' या नावाची एक नाटक कंपनी चालवणाऱ्या कोठीवाले यांनी ऐतिहासिक, सामाजिक, पौरोणिक आणि काल्पनिक विषय मिळून ३० एक नाटके लिहिली. त्यामध्ये 'मदनहन', 'सर्पमित्र' ही पौराणिक, 'ताई ते-लीण', 'पहिला पेशवा' ही ऐतिहासिक, 'धर्मसंग्राम', 'गजान्तलक्ष्मी', 'गुलामराजे' ही काल्पनिक तर 'मनु पालटला', 'सं. सोन्याचा धूर', 'विद्यालंकार' ही सामाजिक आणि 'श्री रण छोडराय' हे हिंदी नाटकही त्यांच्या नावावर आहे. याशिवाय 'दिनानाथ स्मृतिदर्शन', 'गडकरी जीवनचरित्र' ही चरित्रात्मक आणि सावरकरांच्या 'संन्यस्त खड्ग' नाटकावरील टीका' हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९०९ :** दैनिक ज्ञानप्रकाशचे रात्रपाळीचे उपसंपादक आणि शेतकी-शेतकरी पाक्षिकांचे संपादन करणारे सहकार महर्षी डॉ. रघुनाथ गोविंद काकडे यांचा जन्म. **१९३१ :** बालसाहित्यिक, छायाचित्रकार आणि पुस्तक मांडणीतले एक तज्ञ देविदास तुकाराम बागूल यांचा जन्म. 'बालवाङ्मय' हे बालवाङ्मयाचा आढावा घेणाऱ्या पुस्तकांसह 'शैशवदूत', 'मोहरणारी झाडे' ही त्यांची आणखी काही लहानमुलांसाठीची वैशिष्ट्यपूर्ण पुस्तके याशिवाय 'आस्तिक नास्तिक', 'लौकिक ज्ञानेश्वर', 'नवे बालसंगोपन', 'माझी छायाचित्रकला' मिळून वीस एक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३४:-** समीक्षक, विविध नियतकालिकांतून चर्चात्मक लेख, कथाकार शोभा बुचे यांचा जन्म. ह्यांनी 'मराठी ज्ञानकोश आणि ज्ञानकोश रचनाशास्त्र' ह्या संदर्भग्रंथासह 'स्व. डॉ. ना. गं. बुचे यांचा 'बालकाण्ड' हा तुलसीरामायणातील पहिला भाग मराठीत आणला. याशिवाय कथा, ललित लेखन, प्रवासवर्णन आदी स्वरुपाचे लेखन त्यांनी मासिके, वृत्तपत्रातून केले. **१९३६ :** कथा-कादंबरीकार वामन सदाशिव पात्रीकर यांचा जन्म. 'सखाराम शिंपी', 'कलंदर बिलंदर' या बालनाट्यांसह 'सूर्यविलाप' हा एकांकिकासंग्रह, 'जगबुडी' ही कादंबरी आणि 'किंक' हा कथासंग्रह आदी पुस्तके त्यांची. **१९३८ :** विविध नियतकालिकांतून शास्त्रीय विषयांवर लेखन करणारे लेखक प्रा. डॉ. रामचंद्र विठ्ठल रानडे यांचा जन्म. 'चिचुंद्री' या प्राण्यावर पीएच डी तसेच सागरी जीवनाचा परिचय करुन देणारी 'सागर राज्याच्या राज्यात' ह्या दीर्घकथेसह 'प्रायोगिक जीवशास्त्र' हा गोडया पाण्यातील प्राणी वनस्पती जीवन यावर बेतलेला तर 'मधमाशा - जीवन आणि पालन' हा मधमाश्यांची शास्त्रशुध्द माहिती देणारा ग्रंथ प्रसिध्द . **१९६७ :-** अर्थतज्ञ प्रा. दत्तात्रय गोपाळ कर्वे यांचे निधन. 'अर्थशास्त्र', 'भारतीय अर्थशास्त्र' हे दोन ग्रंथ वा. गो. काळे यांच्या सहकार्याने तर 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्या. रानडे' हा अनुवाद ग्रंथ अशी साहित्य संपदा. **२००३:-**संस्कृत विद्वान डॉ. चिंतामणी गणेश काशिकर यांचे निधन. संस्कृत महाकोशाचे संपादकपद भूषवणारे डॉ. काशिकर काही काळ टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु होते. पुणे विद्यापीठाने त्यांच्या 'भारद्वाज श्रौतसूत्रे' या ग्रंथाला डी. लिट. ही सन्मानिय पदवी दिली.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost In lakhs |
|---|---|---|
| Tend-50/ 24-25 RFX 7000033194 | Supply of crimping machine and Hydraulic conductor cutter to 400kV R.S. Kharghar. Tender Fee **Rs. 500/- +GST** | **Rs. 9.76 Lakhs** |
| Tend-53/ 24-25 RFX 7000034065 | Providing and fixing of universal name plate to D/C & M/C towers for various EHV lines under EHV lines maintenance S/Dn. Padgha - I & Padgha - II under EHV (O&M) Dn. Dombivali under EHV (O&M) Circle, Panvel. . Tender Fee **Rs. 500/- +GST** | **Rs.37.98 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 27.12.2024 to 08.01.2025 up to 11:00 hrs**, **Opening date:-08.01.2025 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL.**

---

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड**
दुरध्वनी क्रमांक २६९३१७-०२१४० - फॅक्स २६९०४२-
Email ID - tahasiltala@gmail.com

क्र.प्रशासनकात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/१६८२/२०२४ दि.०९/१२/२०२४

### जाहिर नोटीस मसुदा

श्रीम नासिमा मुश्ताक सत्वारे
मु. मांदाड ता. तळा जि. रायगड — अर्जदार
विरूद्ध
१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत मांदाड — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार श्रीम. नासिमा मुश्ताक सत्वारे यांचा जन्म दि.१७/०३/१९६४ रोजी मौजे मांदाड ता.तळा, जि.रायगड येथे झाला असून त्यांची जन्मनोंद सामनवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.२५/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा जन्म दि.१७/०३/१९६४ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणे करीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदर दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास जाहिर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार श्रीम. नासिमा मुश्ताक सत्वारे यांना जन्मनोंदीबाबत प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. ०९ डिसेंबर, २०२४ रोजी माझे सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**
ज.म.र अर्ज ३२/२०२४

### जाहिर नोटीस

श्रीम सुलभा गोपिनाथ शिंदे — अर्जदार
रा. पो. झिराड
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत झिराड, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार यांच्या मुलीचा (शिल्पा गोपिनाथ शिंदे) जन्म दि २७/१०/१९८२ रोजी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत झिराड कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. ३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत झिराड येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत झिराड यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २४/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २४/१२/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २४/१२/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

**महसुल व वनविभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय,तळा जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक २६९३१७-०२१४०- फॅक्स२६९०४२**
Email ID : tahasiltala@gmail.com

क्र.प्रशासनकात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/१६८३/२०२४ दि. ०९/१२/२०२४

### जाहिर नोटीस मसुदा

श्री मुश्ताक अलिमिया सत्वारे — अर्जदार
मु. मांदाड ता. तळा जि. रायगड
विरुद्ध
१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत मांदाड — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार श्री मुश्ताक अलिमिया सत्वारे यांचा जन्म दि.०१/०६/१९५९ रोजी मौजे मांदाड ता. तळा, जि.रायगड येथे झाला असून त्यांची जन्मनोंद सामनवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.२५/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा जन्म दि. ०१/०६/१९५९ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणे करीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदर दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास जाहिर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून एक महिन्याचे मुदती पर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी. सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार श्री मुश्ताक अलिमिया सत्वारे यांचे जन्म नोंदीबाबत प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**सुहास दत्तात्रय गवाणकर, स्मरणार्थ अलिबाग**
**कै. कमलाकर अंबरीश पाटील स्मरणार्थ अलिबाग**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**
ज.म.र अर्ज ३२/२०२४

### जाहिर नोटीस

प्रति,
श्रीम सुलभा गोपिनाथ शिंदे — अर्जदार
रा. पो. झिराड
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत झिराड, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार यांच्या मुलीचा (स्वाती गोपिनाथ शिंदे) जन्म दि २/०५/१९७५ रोजी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत झिराड कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. ३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत झिराड येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत झिराड यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २४/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २४/१२/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २४/१२/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. किरण अनंत म्हात्रे व श्रीमती अंकिता अविनाश म्हात्रे, राहणार सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. किरण अनंत म्हात्रे व श्रीमती अंकीता अविनाश म्हात्रे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सारळ, ता. अलिबाग | १८६ | ०-३९-५०<br>०-०७-३० पो.ख.<br>०-४६-८० एकूण | ०८-१३ |

अलिबाग, — सही/-
दिनांक : २४/१२/२०२४. — **(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

---

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मिळकतखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. कमळाकर दत्तात्रेय ठोंबरे, राहणार मिळकतखार, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. कमळाकर दत्तात्रेय ठोंबरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| मिळकतखार, ता. अलिबाग | १५७ | ०-१७-७०<br>०-०१-३० पो.ख.<br>०-१९-०० एकूण | ०२-७५ |

अलिबाग, — सही/-
दिनांक : २४/१२/२०२४ — **(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

---

### नोटिस

सर्व नागरिकांना या नोटिसद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशीलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्या जमिन मिळकतीचे मालक १) भरत नाना मोहिते व २) अंकुश नाना मोहिते यांचेकडून विकत घेण्याचे ठरलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :- मौजे नसरापूर, ता. कर्जत, जि. रायगड**

| स.न. | हि. नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २६ | ४ ब | ०.१५.०० | १.५६ |

तरी वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसऱ्या कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथम कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर जमिन मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे. असे गृहीत धरून आमचे अशील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमच्या आशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दिनांक : २७/१२/२०२४

**ॲड. दामिनी अरुण बासरे/गायकर**
पत्ता : फ्लॅट नं. २०१, दुसरा मजला गणेश कृपा बिल्डिंग गारपोली, पो. कोषाणे,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो. नं. ७०८३६३६०५२/९७६७६३६०५२

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**
ज.म.र अर्ज ३३/२०२४

### जाहिर नोटीस

प्रति,
श्रीम सुलभा गोपिनाथ शिंदे
रा. पो. झिराड — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत झिराड, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार यांच्या मुलीचा (वैशाली गोपिनाथ शिंदे) जन्म दि ९/९/१९७३ रोजी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत झिराड कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. ३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत झिराड येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत झिराड यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २४/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २४/१२/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २४/१२/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

### जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये निर्मला बाई वसंत पाटील, मोहन वसंत पाटील, सुधीर वसंत पाटील, विकास वसंत पाटील, प्रफुल्ल वसंत पाटील, छाया हरिश्चंद्र थळे, जयवंती शरद पाटील, सचिन शरद पाटील, वर्षा शरद गौडर ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - पेझारी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित
भूमापन क्रमांक व उपविभाग ५५/२, एकूण क्षेत्र ०-७६-८० (हे.आर.चौ.मी.) आकार १२ रु.०६ पै.,

ठिकाण: अलिबाग
दिनांक : २८/१२/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

---

### जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये नेहा अशोक दांडेकर, रजनी अशोक दांडेकर (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- पेझारी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित
भूमापन क्रमांक व उपविभाग ५१/४, एकूण क्षेत्र ०-४०-६० (हे.आर.चौ.मी.) आकार ६ रु.२५ पै.,

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २८/१२/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

---

### शुद्धीपत्रक

दि.१५/११/२०२४ रोजी ॲड.कोमल अनिल मगर यांची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली होती. त्यामध्ये जाहीर नोटीसीचा दिनांक नजरचुकीने १४/१२/२०१४ असे छापण्यात आले होते. तरीही तसे न वाचता १४/११/२०२४ असे वाचावे.

---

### जाहीर नोटीस

दि. २८/१२/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे टाकवे, ता. कर्जत जि. रायगड येथील

| मालकाचे नाव | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री. केनीथ खान | ६५ | १ | ०-५९-०० | ०-५५ |
| | ६५ | २ | ०-३८-०० | ०-३६ |
| | ६५ | ३ | ०-३२-०० | ०-३० |
| | ६५ | ४ | ०-३०-०० | ०-२८ |
| | ६५ | ५ | ०-२९-७० | ०-२८ |
| | ६६ | ३ | ०-०५-६० | ०-०३ |
| | ६६ | ५ | ०-०५-६० | ०-०५ |

च्या शेतजमीन मिळकती विदयमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत,
जि. रायगड भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

---

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराडपाडा ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अजित प्रल्हाद मोरे रा. लोधा लक्झरिया, मागीवाडा ठाणे पश्चिम यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| झिराडपाडा ता. अलिबाग जि. रायगड | १३०/२ | ०-२५-०० | २.६२ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- २७/१२/२०२४ — सही /-
**ॲड. रिया गणेश पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
रा.मु.नेहुली, पो.खंडाळे ता.अलिबाग,
जि.रायगड. मोबाईल नं. ८८०५३२८६४६

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे सातघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अनु | मौजे | गट नं | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १. | सातघर | ३६ | ००-२२-००<br>पो.ख. ००-०५-००<br>एकूण ००-२७-०० | १.७५ | प्रमोद रघुनाथ पाटील |
| २. | सातघर | ३७ | ००-२२-४०<br>पो.ख.००-०५-१०<br>एकूण ००-२७-५० | १.८४ | स्मिता प्रकाश पाटील |
| ३. | सातघर | ३८ | ००-५९-७०<br>पो.ख. ००-१३-६०<br>एकूण ००-७३-३० | १२.५५ | पैकी<br>१) प्रभाकर रघुनाथ पाटील<br>२) कांचन मिलिंद थळी<br>३) प्रमोद रघुनाथ पाटील<br>४) इंदूबाई भालचंद्र थळे<br>५) गुलाब नरहरी कडवे<br>६) जयंता मोतीराम ठाकूर<br>७) स्मिता प्रकाश पाटील<br>८) मुस्कान लतिफ सिद्धीकी<br>९) वर्षा स्वप्निल म्हात्रे<br>१०) स्नेहा सुहास पाटील<br>११) विश्वानंद हिराजी पाटील<br>१२) राकेश हिराजी पाटील<br>१३) दिपीका जगन्नाथ कार्लेकर<br>१४) नेहा संदेश डाकी<br>१५) प्रमोद काशिनाथ पाटील<br>१६) कल्पना विलास ठाकूर<br>१७) प्रतिभा मनोहर म्हात्रे<br>१८) प्रदीप काशिनाथ पाटील<br>१९) प्रमोद रघुनाथ पाटील<br>यांचा संपुर्ण अविभक्त हिस्सा |

सदरच्या संपुर्ण मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे, मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग — **ॲड. विधान अरविंद पाटील**
ता.२८/१२/२०२४ — 'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग जि. रायगड
मो.नं.९४२२३७५११५

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक, सौ. लिखिता दर्शन गोविंदराजू यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव | १७२५ | ०-२७-३०<br>पो.ख. ०-०१-७०<br>०-२९-०० | ०४.७४ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग — **ॲड. विधान अरविंद पाटील**
ता. २८/१२/२०२४ — रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

# भारताच्या महिलांची कमाल कामगिरी

## दीप्ती शर्माची अष्टपैलू भूमिका; एकदिवसीय मालिकेत विंडिजचा व्हाईटवॉश





**। वडोदरा । वृत्तसंस्था ।**

भारत आणि वेस्ट इंडिजच्या महिला संघांमध्ये वडोदरा येथे ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका आयोजित करण्यात आली होती. त्यातील शेवटचा सामना शुक्रवारी (दि.२७) रोजी खेळवला गेला. भारतीय संघाने पहिले २ सामने जिंकून आधीच मालिका खिशात घातली होती. आता संघाने शेवटचा सामनाही जिंकून वेस्ट इंडिजचा ३-० असा व्हाईटवॉश केला आहे.

सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजचा संघ मोठ्या धावा करू शकला नाही. संपूर्ण संघ ३८.५ षटकात १६२ धावांवर सर्व बाद झाला. प्रत्युत्तरात, भारतीय संघाने २८.२ षटकांत ५ गडी राखून १६७ धावा करून विजय मिळवला आहे. भारताची फिरकी अष्टपैलू दीप्ती शर्माच्या घातक गोलंदाजीने भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ती आता भारतासाठी एकदिवसीय सामन्यांतील सर्वाधिक वेळा ५ बळी घेणारी गोलंदाज बनली आहे.दरम्यान, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजची सुरुवात खूपच खराब झाली. त्यांचे पहिले ३ बळी केवळ ९ धावांवर गेले होते. भारताच्या रेणुका सिंगने सलाम ीवीर कियाना जोसेफ आणि कर्णधार हेली मॅथ्यूजला खातेही उघडण्याची संधी दिली नाही. तिने डायंड्रा डॉटिन (५) हिला आपला तिसरा बळी बनवले. येथून वेस्ट इंडिजचा डाव सांभाळण्याचे काम शमीन कॅम्पबेल आणि चिनेल हेन्री या जोडीने केले. या दोघींनी चौथ्या बळीसाठी ९१ धावांची भागीदारी केली. कॅम्पबेलने ४६ धावा केल्या आणि अर्धशतकाच्या जवळ आल्यावर ती बाद झाली. तर, हेन्री अर्धशतक झळकावण्यात यशस्वी ठरली. तिने ६१ धावांची खेळी खेळली. या दोघी बाद झाल्यानंतर वेस्ट इंडिजचा डाव पुन्हा एकदा अडखळला. आलिया अ‍ॅलन (२१) वगळता उर्वरित फलंदाज एकापाठोपाठ एक बाद झाले. या कारणामुळे त्यांचा डाव ३९व्या षटकातच संपला. भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक ६ आणि रेणुका सिंगने ३ बळी घेतले आहेत.

लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवातही खास झाली नाही. शानदार फॉर्मात असलेली सलामीवीर स्मृती मंधाना अवघ्या ४ धावा करून बाद झाली. त्याचवेळी, गेल्या सामन्यातील शतकवीर हरलीन देओलच्या बॅटमधून फक्त १ धाव आली. प्रतिका रावलही १८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. कर्णधार हरमनप्रीत कौरने २२ चेंडूत ७ चौकार मारत ३२ धावांची खेळी केली. जेमिमा रॉड्रिग्जच्या बॅटमधून २९ धावा आल्या. यानंतर दीप्ती शर्माने नाबाद ३९ आणि ऋचा घोषने नाबाद २३ धावा करत संघाला विजयापर्यंत नेले.

# नारंगी शाळेचा दिमाखदार विजय



**। वावोशी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यातील नारंगी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. वडगाव येथे आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करत सर्वांचे लक्ष वेधले आहे.

नारंगी शाळेच्या मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर लगोरी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत शाळेने एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या स्पर्धेत ३ बीट पातळीवरील विद्यार्थी सहभागी झाले होते. वावोशी बीटने सर्वाधिक पारितोषिके मिळवून चॅम्पियन ट्रॉफी आपल्या नावावर केली आहे. तालुका गटशिक्षणाधिकारी चोरामले यांच्या हस्ते या चषकाचे वितरण करण्यात आले.

शालेय शिक्षण क्षेत्रासाठी हे यश प्रेरणादायी असून या यशामागे मुख्याध्यापिका शिल्पा पाटील, शिक्षक भागिनाथ पोटे, दीपक खाडे, नम्रता यादव व केंद्रप्रमुख संतोष पाटील यांचे अथक मार्गदर्शन आहे.

तसेच, नारंगी शाळेने तालुकास्तरीय स्पर्धेत दिमाखदार विजय संपादन केल्याबद्दल सरपंच भारती आरावकर, उपसरपंच देवेंद्र देशमुख, ग्रामविकास अधिकारी गणेश मोरे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अर्चना वाघुले व सदस्य, वासूदेव देशमुख, नरेंद्र गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून शाळेच्या या यशस्वी कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# रायगड जिल्हा कुमारी संघ जाहीर



**। गडब ।वार्ताहर ।**

सांगली येथे होणाऱ्या ५१व्या महाराष्ट्र राज्य अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कबडी असो.ने मुलींचा कबडी संघ जाहीर केला आहे. या संघाचा सराव शिबीर नुकताच पेझारी येथील बाल युवक मंडळाच्या क्रिडांगणावर संपन्न झाला आहे. तसेच, रायगड जिल्ह्याच्या कुमारी गटाच्या कबड्डी संघाने राज्य अंजिक्यपद कबड्डी स्पर्धेत चागली कामगिरी करावी, असे जिल्हा कबड्डी असो.चे सहकार्यवाह जे.जे. पाटील यांनी खेळांडुना मार्गदर्शन करताना सांगितले आहे.

खेळांडुनी सराव शिबिरात कसुन सराव केला असुन रायगडचा संघ राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत चमकदार कामगिरी करेल, असे संघाचे प्रशिक्षक जनार्दन पाटील यांनी सांगितले आहे. तर, राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी या संघात अनुभवी खेळाडू असून सांघिक खेळ करुन या स्पर्धेत विजय संपादन करु, असे कर्णधार हर्षदा पराठे हिने सांगितले आहे. रायगड जिल्ह्याच्या कबड्डी संघात निवड झालेल्या खेळांडुचे रायगड जिल्हा कबडी असो.च्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

**कुमारी गट कबड्डी संघ**

**हर्षदा पराठे (कर्णधार), पायल निगडे (उपकर्णधार), अन्यना निर्मल, श्रावणी पाटील, एकता पाटील, आदिती पालवणकर, अंकीता घारे, वैष्णवी पाटील, रुतिका पाटील, दिपिका गाडे, सावली गोरे, तन्वी पाटील. संघ प्रशिक्षकः जनार्दन पाटील, संघ व्यवस्थापीकाः रुणाली मोकल.**

# महाराष्ट्राचा मेघालयवर विजय




**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

गोलंदाजांच्या भेदक कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघाने मेघालय संघाचा ९ गडी आणि २१४ चेंडू राखून धुव्वा उडवत विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धेत सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली आहे.

नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या मेघालय संघाचा डाव ३७.१ षटकांत ११३ धावांत गुंडाळल्यानंतर महाराष्ट्र संघाने हे आव्हान १४.२ षटकांत पार केले आहे. आणि 'ब' गटात १२ गुणांसह पहिले स्थान कायम ठेवले आहे. यावेळी, विजयासह सरासरीही अधिक चांगली करण्याची समोर आलेली संधी महाराष्ट्राच्या सलामीवीरांनी साधली आहे.

दरम्यान, गेल्या सामन्यात शतकी खेळी करणारा ऋतुराज गायकवाड या सामन्यात सलामीला आला नाही. ओम भोसले आणि सिद्धेश वीर यांनी यावेळी सलामी केली. त्यांनी १६.५ षटकांत ९७ धावा फटकावल्या. ओम भोसले ४६ धावांवर बाद झाला, तर सिद्धेश वीरने नाबाद ५७ धावा केल्या आहेत. तसेच, सिद्धेश वीरने गोलंदाजीतही ३ बळींचे योगदान दिले आहे. तसेच, महाराष्ट्र संघाकडून सत्यजित बच्छाव आणि रजनीश गुरबानी यांनीही प्रत्येकी२ बळी मिळविले आहेत.

महाराष्ट्र संघाचा पुढचा सामना हिमाचल प्रदेश संघाविरुद्ध होणार आहे.

# कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथील कुस्ती प्रशिक्षण केंद्रात रायगड जिल्हा, अलिबाग तालुका कुस्तीगीर संस्था व हनुमान तालिम संघ वाडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२९) दुपारी २:०० वाजता जिल्हा कुस्ती अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते १२ या दरम्यान वजनाची वेळ असेल, असे रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटना अध्यक्ष जयेंद्र भगत यांनी सांगितले आहे. या जिल्हा कुस्ती अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत सब ज्युनिअर मुलीं, सब ज्युनियअर मुलें, वरिष्ठ गट पुरूष गादी व माती, वरिष्ठ गट महिला विभाग, वरिष्ठ गट पुरूष ग्रीकोरोमण, बाळ गट मुंली व बाळ गट मुले या गटात वजनानुसार कुस्ती खेळविण्यात येणार आहेत.

# अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा उत्साहात



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथील कुस्ती प्रशिक्षण केंद्रात तालुका कुस्तीगीर संघटना व वाडगाव हनुमान तालिम संघ यांच्या विद्यमाने बुधवारी (दि.२५) तालुका अजिंक्यपद कुस्ती निवड चाचणी स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी तालुक्यातील अनेक गावागावांतील कुस्तीपटू मल्लांनी या निवड चाचणीत सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत सब ज्युनिअर मुलें, सब ज्युनिअर मुलीं, वरिष्ठ गट पुरूष माती व गादी, वरिष्ठ गट महिला विभाग, वरिष्ठ गट पुरूष ग्रिको रोमन, बाळ गट मुले व बाळ गट मुली आदी वजनाच्या कुस्त्या गुणांवर खेळविण्यात आल्या होत्या. कुस्ती स्पर्धेचे सुत्रसंचलन व समालोचन प्रमोद भगत यांनी केले. तसेच, स्पर्धेत वैभव मुकादम, सुधाकर पाटील, प्रसन्ना पाटील, जितेंद्र गांवड, व यतिराज पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले.

यावेळी, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटना तथा अलिबाग तालुका कुस्तीगीर संघटना अध्यक्ष जयेंद्र भगत, उपाध्यक्ष कृष्णा भोपी, प्रसाद भगत, रविंद्र घासे, वैभव मुकादम, विलास पाटील, चंद्रकांत थळे, गोपिनाथ ठाकूर, सरपंच सारिका पवार आदींसह ग्रामपंचायत सदस्य, अन्य मान्यवर व कुस्तीप्रेमी मंडळी यांची उपस्थिती होती.

## मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# किशोरी संघांची उपांत्य फेरीत धडक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहर कबड्डी असो. आयोजित मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर पार पडत आहेत. या स्पर्धेत शिवशक्ती 'अ', महर्षी दयानंद स्पोर्ट्स व अंकुर स्पोर्ट्स यांनी १४ वर्षाखालील मुलींच्या गटातील उपांत्य फेरी गाठली आहे. शिवशक्ती 'अ' विरुद्ध चंद्रोदय क्रीडा मंडळ व महर्षी दयानंद विरुद्ध अंकुर स्पोर्ट्स अशा उपांत्य लढती होणार आहेत.

स्पर्धेतील उपांत्यपूर्व मुलींच्या सामन्यात शिवशक्ती 'अ'ने श्री गणेश स्पोर्ट्सचा दुबळा प्रतिकार ४९-३० असा मोडून काढला. विश्रांतीला २५-११ अशी आघाडी घेणाऱ्या शिवशक्तीने नंतर सावध खेळ करीत आपला विजय साकारला आहे. वैष्णवी सुतार, जान्हवी पोतदार यांच्या चढाई पकडीच्या खेळाला विजयाचे श्रेय जाते. दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात महर्षी दयानंदने रोहिणी कदम, धनश्री पालवे यांच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर शिवशक्ती 'ब' चा ५४-३३ असा पाडाव केला. पूर्वार्धात २८-१२ अशी आघाडी घेणाऱ्या महर्षी दयानंदने उत्तरार्धात त्याच गतीने खेळ करीत गुणांचे अर्धशतक पार केले. उत्तरार्धात शिवशक्तीच्या अस्मी कोकाटे, प्राची वर्मा यांनी आपला खेळ उंचावत पराभवातील अंतर कमी केले. तिसऱ्या उपांत्य पूर्व सामन्यात अंकुर स्पोर्ट्सने जिजामाता महिला संघाला ४५-१४ असे सहज नमवित उपांत्य फेरी गाठली. विश्रांतीला ३१-०६ अशी भक्कम आघाडी घेत विजयाचा पाया रचला होता. विश्रांतीनंतर आणखी १५ गुण घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. गायत्री गुप्ता, मुक्ता चौहान यांच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते.

पुरुषांच्या द्वितीय श्रेणी गटात शिवनेरी स्पोर्ट्सने ५-५ चढायांच्या डावात गोकुळ मित्र मंडळाला ४३-३७ अशी मात करीत दुसरी फेरी गाठली आहे. मध्यांतराला २६-१८ अशी आघाडी घेणाऱ्या शिवनेरीला गोकुळ मित्र मंडळाला पूर्ण डावात ३४-३४ असे बरोबरीत रोखले. साहिल आवळे, अमन नवले यांच्या संयमी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. गोकुळ मित्रच्या संतोष घडसी, संतोष भाटकर यांनी कडवी लढत दिली. पण संघाला विजयी करण्यात ते थोडे कमी पडले.

द्वितीय श्रेणीच्या इतर सामन्यांत श्री गावदेवीने श्री गणेशला २८-१३, वीर संताजीने न्यू वर्ड्सला ३१-१८, हिंद केसरीने न्यु पर्शुराम बॉईजला ४०-१९, तर अमरदिपने नवनाथला ३४-२२ असे पराभूत करीत दुसरी फेरी गाठली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- अलिबाग आणि परिसरातील Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१
- रिसोर्टमध्ये काम करण्यास मुलगा हवा आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण सासवणे.
- रिसोर्टमध्ये काम करण्यास जोडपं हव आहे. संपर्क- ९६०७१०२३५७ ठिकाण सासवणे.
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलमध्ये नर्सची आवश्यकता आहे. संपर्क ९८५०३४८५०६, ९८२२४०९८४९.
- रिसॉर्ट भाड्याने देणे आहे. ६ A/c Rooms, किचन हॉल स्विमिंगपुल नारळाची वाडी पार्किंगसह (एकूण क्षेत्र १० गुंठे) संपर्क- ८३२९१७५७९१ ठिकाण आक्षी (रायवाडी)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## अलविदा..

प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना गुरुवारी रात्री दिल्लीतील एम्स रुग्णालयातील अतिदक्षता विभागात त्यांना दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान रात्री ९ वाजून ५१ मिनिटांनी त्यांचे निधन झाले. मनमोहन सिंग यांच्यामागे पत्नी गुरशरण कौर व तीन कन्या असा परिवार आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी दोनदा देशाचे पंतप्रधानपद भूषविले. गेल्या काही वर्षांपासून ते प्रकृतीच्या तक्रारींमुळे त्रस्त होते. त्यांना याआधी काही वेळा प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात भरती करण्यात आले होते. त्यांचे निधन झाल्याचे वृत्त कळल्यानंतर काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी, सरचिटणीस व खासदार प्रियांका गांधी, भाजपचे अध्यक्ष व केंद्रीय मंत्री जगतप्रकाश नड्डा यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी एम्समध्ये दाखल होत त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

**मनमोहन सिंग यांची कारकीर्द**

डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी पाकिस्तानातील गाह या गावी झाला. १९४७ साली फाळणीदरम्यान विस्थापित होऊन त्यांचे कुटुंब भारतात आले. त्यानंतर त्यांनी पंजाब विद्यापीठातून पदवीपर्यंतचे तर ऑक्सफर्ड विद्यापीठातून अर्थशास्त्रात डॉक्टरेट केली. १९६६ ते १९६९ या काळात त्यांनी संयुक्त राष्ट्रांत काम केले. नंतरच्या काळात ते केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयात सल्लागार म्हणून रुजू झाले. १९७२ ते १९७६ या काळात केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले. १९८२ ते १९८५ या काळात त्यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून काम केले. त्यानंतर १९८५ ते १९८७ या काळात त्यांनी नियोजन आयोगाच्या अध्यक्षपदावर काम केले. १९९६ साली सिंग हे राज्यसभेचे विरोधी पक्षनेते होते. २००४ साली यूपीएची सत्ता आल्यानंतर सिंग यांनी देशाचे १३ वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. २००४ ते २०१४ या काळात त्यांनी दोन वेळा पंतप्रधानपद भूषवले. एप्रिल २०२४ मध्ये त्यांनी राज्यसभेतून निवृत्ती घेतली.

**भूकबळी ठरू नये म्हणून खाद्य सुरक्षा कायदा**

कोणीही भूकबळी ठरू नये यासाठी खाद्य सुरक्षा कायदा त्यांनी केला. भूसंपादन कायदा तसेच वनअधिकार कायदा हीसुद्धा त्यांच्याच कार्यकाळाची देणगी. प्रत्येक

पान १ वरुन

ग्रामीण परिवाराला वर्षातून कमीत कमी १०० दिवस काम देण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम त्यांच्या सरकारने आणला. त्यालाच आता मनरेगा या नावाने ओळखले जाते. गर्भावस्थेपासून माता आणि बाळाची काळजी घेणारी इंदिरा गांधी मातृत्व योजना त्यांनी आणली. आर्थिक मदत तसेच अन्य सामुग्रीची व्यवस्था त्यातून केली गेली.

**अमेरिकेकडूनही शोक प्रस्ताव**

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर अमेरिकेकडूनही शोक प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. उत्कृष्ट चॅम्पिअन असा सिंग अशा शब्दात डॉ. मनमोहन सिंग यांचा उल्लेख करण्यात आला आहे. भारत आणि अमेरिकेच्या धोरणात्मक भागीदारीचे चॅम्पियन म्हणजे मनमोहन सिंग होते. दोन्ही देशांचे संबंध सुधारण्यासाठी सिंग यांनी प्रयत्न केले होते.

**देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकीर्दीत त्यांना अनेक महत्त्वाचे पुरस्कार मिळाले. डॉ. मनमोहन सिंग यांना १९८७ या काळात भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण पुरस्कार मिळाला. त्यानंतर भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्मशताब्दी सन्मान (१९९५), अर्थमंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवॉर्ड (१९९३ आणि १९९४), केम्ब्रिज विद्यापीठाचा ॲडम स्मिथ पुरस्कार (१९५६), केम्ब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल राईट पुरस्कार असे काही विशेष पुरस्कार मिळाले.

**मनमोहन सिंग हे एक दुर्मिळ राजकारणी होते. त्यांनी शैक्षणिक आणि प्रशासनाच्या विश्वालादेखील तितक्याच सहजतेने आपलेसे केले. देशसेवा, उत्तम राजकारणी आणि अत्यंत नम्रतेसाठी ते नेहमीच स्मरणात राहतील. त्यांचे कुटुंब, मित्र आणि समर्थकांप्रती माझ्या संवेदना व्यक्त करते.**

**- द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती**

माजी पंतप्रधान प्रतिष्ठत अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने खूप दुःख झाले. १९९१ मध्ये पद्मविभूषण पुरस्कार प्राप्त, देशाच्या आर्थिक उदारीकरणाचे शिल्पकार तथा एका गंभीर प्रसंगातून देशाला धैर्याने चालवणाऱ्या मनमोहन सिंग यांनी विकास आणि समृद्धीचे नवीन मार्ग उघडले. अर्थव्यवस्थेबद्दलची त्यांची प्रगल्भ समज, सौम्य वागणूक आणि देशाच्या प्रगतीसाठी असलेली बांधिलकी माझ्या स्मरणात कायमस्वरूपी राहील.

**- जगदीप धनखड, उपराष्ट्रपती**

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर ते देशाचा अर्थमंत्री आणि पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग यांनी हिंदुस्थानच्या शासन व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावली.- **अमित शहा, गृहमंत्री**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने एक दूरदर्शी राजकारणी आणि अर्थतज्ज्ञ गमावला आहे. कामगार मंत्री, रेल्वे मंत्री आणि समाजकल्याण मंत्री म्हणून त्यांच्या मंत्रिमंडळात काम करता आले याचा मला अभिमान आहे. राष्ट्रनिर्मितीतील त्यांचे अतुलनीय योगदान देशाच्या इतिहासात कायमचे कोरले जाईल.

**- मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस अध्यक्ष**

देशाने एक उमदा प्रशासक, अर्थतज्ज्ञ गमावला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री, पंतप्रधान अशा विविध भूमिकांमधून त्यांनी काम केले आणि देशवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. देशाच्या राजकारणात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अर्थशास्त्राशी संबंधित विपुल लेखनही त्यांनी केले. त्यांनी केलेले कार्य कायम देशवासियांच्या स्मरणात राहील. **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## ..क्रीडाप्रेमींसाठी पर्वणी

एस.पी. सुपर प्लेअर्स, म्हात्रोळी येथील आद्य सप्लाअर्स, थळमधील एम.डी. वॉरिअर्स, नागाव येथील सिया वॉरिअर्स, दिघोडीमधील अर्जुन इलेव्हन या संघाचा समावेश आहे. नव्या २०२५ वर्षाच्या सुरुवातीला अलिबागमध्ये क्रीडाभवन येथे ९ ते ११ जानेवारी अशी तीन दिवस स्पर्धा होणार आहे. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या संकल्पनेतून स्पर्धेचे हे दुसरे पर्व असणार आहे. अलिबाग तालुका मर्यादित या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला २ लाख रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला १ लाख रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेतील मालिकावीराला दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना सायकल आणि विजेत्या व उपविजेत्या संघाला एलईडी टीव्ही देऊन सन्मानित केले जाणार आहे. ही स्पर्धा प्रो-लिंक स्पोर्ट्स व एफएच स्पोर्ट्सवरदेखील घरबसल्या पाहता येणार आहे.

## जड-अवजड वाहनांना बंदी

सकाळी सहा ते रविवारी (दि.२९) रात्री बारा वाजेपर्यंत ही बंदी राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

थर्टी फर्स्टनिमित्त २८ व २९ डिसेंबर रोजी शनिवार व रविवार रोजी सार्वजनिक सुट्टी आहे. पर्यटक मोठ्या प्रमाणात येणार आहेत. वाहतूक कोंडीमुळे पर्यटक व नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागू नये. अपघात रोखण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून तसेच पर्यटक व नागरिकांचा प्रवास सुखरूप व्हावा यासाठी शनिवारी (दि.२८) सकाळी सहा ते रविवार (दि.२९) मध्यरात्री बारा वाजेपर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६-अ वर धरमतर पूल ते अलिबाग तसेच अलिबाग ते मांडवा बंदर व अलिबाग-रेवदंडा-मुरूड या राज्यमार्गावरील जीवनावश्यक वस्तू वगळून जड-अवजड वाहनांकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतूक बंदीची अधिसूचना जारी केली आहे.

## वर्षभरात सव्वाशे आंदोलने, मोर्चे

आंदोलन केले आहेत. जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी जिल्ह्यातील पत्रकारांसह वेगवेगळ्या सामाजिक संस्था, संघटनांनी आंदोलने केली आहेत. जिल्ह्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात अनेकांनी उपोषणं केली आहेत. अलिबाग तालुक्यातील उसर येथे दुसऱ्या टप्प्यातील येणाऱ्या प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्याने घेण्यात यावे. तसेच उसर येथे उभ्या राहणाऱ्या शासकिय मेडीकल कॉलेजमध्ये स्थानिकांना रोजगार द्या. शेतकऱ्यांना शेतीमध्ये जाण्यासाठी मार्ग द्या, अशा अनेक मागण्यांसाठी आंदोलने झाली आहेत.

# जागृत ज्वालामुखींचा देश

सफर देशांची

कॉमॉरॉस हा हिंदी महासागरात वसलेला छोटासा देश. आफ्रिका खंडाच्या पूर्व किनारपट्टीजवळ असलेल्या या देशात जागृत ज्वालामुखी आहेत. कॉमॉरियन, फ्रेंच आणि अरबी अशा तीन भाषा या देशात बोलल्या जातात. कॉमॉरॉस ही एकेकाळी फ्रान्सची वसाहत होती. ६ जुलै १९७५ या दिवशी हा देश स्वतंत्र झाला. इथलं वातावरण उष्ण असतं. नोव्हेंबरपासून इथे पावसाला सुरूवात होते. साधारण मे महिन्यापर्यंत पावसाळा असतो. मार्च हा कॉमॉरॉसमधला उष्ण महिना. 'मॉरॉनी' ही कॉमॉरॉसची राजधानी. हेच इथलं सर्वात मोठं शहर असून ते 'ग्रँडे कॉमोरे' नावाच्या बेटावर वसलं आहे. 'ला कारथाला' हे इथलं सर्वात उंच शिखर असून इथे जागृत ज्वालामुखी आहे. इथल्या ज्वालामुखीचा बरेचदा उद्रेक झालेला आहे. 'व्हायलँग व्हायलँग'चं इथे सर्वाधिक उत्पादन होतं. सुगंधी तेलांच्या निर्मितीत या घटकाचा वापर केला जातो. आपण जे व्हॅनिला आईस्क्रीम खातो त्यात व्हॅनिला हा घटक असतो. याच व्हॅनिलाचं उत्पादन कॉमॉरॉसमध्ये मोठ्या प्रमाणावर घेतलं जातं. यासोबतच नारळ, लवंग, केळी अशी पिकंही इथे होतात. हा देश तांदूळ आणि इतर काही धान्यांची आयात करतो. पेट्रोलियम पदार्थ, सिमेंट आणि वाहतुकीसाठी लागणारी उपकरणंही इतर देशांकडून विकत घेतली जातात. कॉमॉरॉस हा गरीब देश असला तरी तो निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. इथले समुद्रकिनारे खूप सुंदर आहेत. घनदाट जंगलंही देशात आहेत. कॉमॉरॉसमध्ये भौगोलिक विविधता पहायला मिळते. 'ग्रँड कॉमोर' हे इथलं सर्वात मोठं बेट आहे. या बेटावर दोन ज्वालामुखी आहेत.




# जाणा आगपेट्यांचा इतिहास

माहीत आहे?

आज आपण प्रगतीच्या एका टप्प्यावर पोहोचलो आहोत. यंत्रं आणि तंत्रांनी आपले खूपसे श्रम कमी केलेले आहेत. आपल्या पूर्वजांना अगदी छोट्या छोट्या कामांसाठीही खूप कष्ट घ्यावे लागायचे. मात्र संशोधकांनी विविध शोध लावले आणि मानवी आयुष्य सुकर आणि कष्टरहित होत गेलं. आता हेच बघा ना, कोणे एके काळी आग निर्माण करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे दगड एकमेकांवर घासावे लागायचे. मात्र जॉन वॉल्करने १८२७ मध्ये आगपेटी तयार केली आणि हे कष्ट वाचले. त्याने लाकडाच्या तुकड्यावर सरस, स्टार्च, एंटीमनी सल्फाईड, पोटॅशियम क्लोरेट लावून काड्या तयार केल्या गेल्या. परंतु सुरक्षित काड्या १८४४ मध्ये स्वीडनच्या ई पोश्च यांनी बनवल्या. या काड्या दोन प्रकारच्या असतात. पहिल्या प्रकारच्या काड्यांना घर्षण काड्या म्हणतात. यात आधी काडीच्या एक चतुर्थांश भागाला विरघळलेल्या मेण किंवा गंधकमध्ये बुडवलं जातं. नंतर फॉस्फरस ट्रायसल्फाईडचे मिश्रण लावलं जातं. त्यावर एंटीमनी सल्फाईड आणि पोटॅशियम क्लोरेटचं मिश्रणं लावलं जातं. घर्षणासाठी बनवलेल्या मिश्रणात काचेचा चुरा किंवा वाळू मिसळतात. पांढरा भाग रगडेपर्यंत निळा भाग जळत नाही. दुसऱ्या प्रकारात सुरक्षित काड्या बनवल्या जातात. या काड्या आगपेटीवरील रसायनावर घासूनच पेटतात. या काड्याही आधी सांगितलेल्या काड्यांप्रमाणेच बनवतात. यात फॉस्फरस ट्रायसल्फाईड वापरलं जात नाही. याऐवजी लाल फॉस्फरस वापरलं जातं. आपल्या घरामध्ये अशाच आगपेट्यांचा वापर होतो.



## ठिपके जुळवा



# कल ओळखा, कारकिर्द घडवा

भविष्यवेध

निवांत दिवसांमध्ये करिअरविषयीच्या नानाविध पर्यायांची माहितीही घेऊन ठेवता येईल बरं का! आपली क्षमता, बुद्धिमत्ता आणि कल लक्षात घेऊन साजेसा पर्याय निवडला तर उत्तम कारकिर्द घडवणं अजिबात अवघड नाही हे लक्षात घ्या आणि कलाकौशल्याला वाव देण्यासाठी सज्ज व्हा.

✻ दोस्तांनो, तुम्हाला स्वयंपाकाची आवड असेल आणि त्यासोबतच धाडसी असं काहीतरी करायचं असेल तर सबमरिन कूक बनण्याचा पर्याय तुमच्याकडे आहे. समुद्राखाली राहून स्वयंपाक करायचा ही किती मस्त कल्पना आहे ना? या करीअरमध्ये चांगलं उत्पन्नही मिळतं.

✻ वेगवेगळे आवाज काढता येत असतील, मिमिक्री करत असाल तर आवाज की दुनिया तुमच्यासाठी खुली आहे. व्हॉईस ओव्हर किंवा डबिंग आर्टिस्ट म्हणून तुम्ही काम करू शकता. विविध कार्टून पात्रं तसंच इंग्रजी चित्रपटांच्या हिंदी व्हर्जनसाठी तुम्ही आवाज देऊ शकता. या क्षेत्रातही बऱ्याच संधी आहेत.

✻ तुमच्याकडे कल्पकता असेल आणि थोडं वेगळं करण्याची इच्छा असेल तर टॉय क्रिएटर बनण्याचा ऑप्शन आहे. मुलांना खेळणी खूप आवडतात. तुम्हीही छान छान खेळणी तयार करू शकता.

✻ फॅशन जगताचं आकर्षण असेल आणि सोबतीला लिखाणाची आवड असेल तर तुम्हाला कुणीही रोखू शकत नाही. फॅशन रायटर बनून तुम्ही चांगली कमाई करू शकता. स्वत:चा ब्लॉग तयार करू शकता किंवा फॅशन मॅगझीन्स किंवा वेबसाईट्ससाठी लिखाण करू शकता.


✻ प्रत्येकाला थ्रीडीचं आकर्षण असतं. थ्रीडी पेंटिंग पाहिल्यावर 'वा, काय कला आहे,' असे शब्द बाहेर पडतात. चित्रकलेची आवड असेल तर थ्रीडी म्युरल पेंटरचा पर्याय निवडता येईल. अशा चित्रांना आज बरीच मागणी आहे. यामुळे तुम्हाला लोकप्रियताही मिळेल. तुमच्या कलेचं खूप कौतुक होईल. कलेच्या निमित्ताने देशाविदेशात सैर करण्याची संधीही तुम्ही मिळवू शकता.



# वाळवंटातही होतं पाणी

धमाल

वाळवंटात पाणी मिळत नाही हे आपल्याला माहिती असेल. सहारा वाळवंटाविषयी तुम्ही ऐकलंच असेल. उत्तर आफ्रिकेत पसरलेलं हे मोठं वाळवंट आहे. तेथे आज पाणी नसलं तरी एकेकाळी तेथे भरपूर पाणी वाहत होतं. गमतीशीर गोष्ट म्हणजे थंडीच्या दिवसात तेथेच अनेकदा बर्फ जमा होतं. सहाराचा मोठा भाग समुद्राजवळ आहे. ज्या भागात पाऊस होतो तेथे पावसाळ्यात उगवणाऱ्या वनस्पती आणि खजुराची झाडं पहायला मिळतात. पण कधीतरी याच वाळवंटात भरपूर झाडं आणि इतर वन्य जीव होते हे वाचून आश्चर्य वाटेल. हा भाग हिरवळीने व्यापलेला होता आणि येथे आफ्रिकी लोक राहत होते. १८५५ मध्ये सहाराचा इतिहास तपासण्यात आला. त्यावेळी जर्मनीतील हेन्रीच बार्थने सहाराचं रेखाचित्र तयार केलं होतं. त्याने सहाराची विभागणी उंटांआधीचा काळ आणि उंट असतानाचा काळ अशी दोन भागात केली. नंतर सहारामध्ये असणाऱ्या गुहांचा अभ्यास करण्यात आला. त्यावेळी तेथे पाण्यामध्ये राहणाऱ्या प्राणी राहत होते असं आढळलं. त्या ठिकाणी घोड्यांची चित्रंही पहायला मिळाली. वाळवंटात पाणी नसतं मग उंट तेथे कसे राहतात असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. उंटाच्या पाठीवर एक फुगीर भाग असतो. त्यामध्ये तो पाणी साठवून घेत असतो. त्यामुळे त्याला बरेच दिवस पाणी प्यायला मिळालं नाही चालतं. त्याची शरीररचनाच या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी उपयुक्त असल्याने पाणी मिळाले नाही तर फुगीर भागातील साठवलेल्या पाण्याचा उपयोग केला जातो. त्यामुळे वाळवंटात उंट राहू शकतात.



# काजवा का चमकतो?

वाचा तर खरं

मित्रांनो, तुम्ही अंधारात काजवा चमकताना कधी पाहिलाय का? प्रत्यक्ष पाहिला नसला तरी त्याच्या गोष्टी तरी नक्की ऐकल्या किंवा वाचल्या असतील. काजवाच्या चमकण्यामागचा मुख्य उद्देश आपल्या जोडीदाराला आकर्षित करुन घेणं आणि आपलं अन्न शोधणं हा असतो. आता शहरांमध्ये काजवे कमीच पहायला मिळतात. ग्रामीण भागात मात्र ते मोठ्या संख्येने दिसतात.

या प्रकाशाने चमकणाऱ्या काजव्यावर १९६७ मध्ये रॉबर्ट बायल यांनी संशोधन केलं होतं. काजव्यांच्या शरीरात फॉस्फरस असतो असं आधी मानलं जात होतं. त्या फॉस्फरसमुळे काजवा चमकतो असं पूर्वी म्हटलं जायचं. पण, काजवा फॉस्फरसमुळे नाही तर त्याच्या शरीरातील बल्किल्युसिफेरेस नावाच्या प्रोटीनमुळे तेज पसरवू शकतो हे जर्मनीच्या या वैज्ञानिकानं सिद्ध करुन दाखवलं. काजव्याचा प्रकाश प्रखर नसला तरी हजारो काजवे एकत्र येतत तेव्हा तो परिसर उजळून जातो. काजवे रात्रीच चमकतात.

काजवे दिसायला अगदी बारीक आणि दोन पंख असणारे कीटक असतात. ते जंगलामध्ये झाडाच्या ढोलीत अंडी घालतात. काजव्याप्रमाणेच चमकणारे अनेक जीव आहेत. काजव्याप्रमाणे चमकणाऱ्या अशा एक हजार प्रजातींचा शोध घेण्यात आला आहे. त्यापैकी काही प्रजाती पृथ्वीवर तर काही प्रजाती समुद्राच्या खोल पाण्यात आढळतात.



## दोस्त हे मस्त

### असे आहेत सी वीड

सी वीड म्हणजे समुद्री वनस्पती. जमिनीवर असलेल्या झाडांप्रमाणे सी वीडला मूळं नसतात. कारण जमिनीतून पाणी तसंच पोषक घटक शोषून घेण्याची त्यांना गरज नसते. त्याऐवजी त्यांच्या पृष्ठभागावर छोटी छिद्र असतात. त्याद्वारे या वनस्पती पोषक घटक शोषून घेतात. सी वीड्सना फुलं येत नाहीत. सी वीडच्या काही प्रजाती खाता येतात. वेगवेगळ्या खाद्यपदार्थांमध्ये त्यांचा वापर होतो.



## माय बॉडी

### नखांची स्वच्छता गरजेची

नखांची स्वच्छता किती महत्त्वाची असते हे तुम्ही जाणताच. नखांखाली घाण साठून पोटात जाते आणि आपल्याला आजारी पाडते. म्हणूनच वेळच्या वेळी नखं कापायला हवीत. पण नखं कापतानाही काळजी घ्या. नखं कापण्याआधी पाच मिनिटं हात–पाय गरम पाण्यात बुडवून बसा. यामुळे नखं मऊ पडतात आणि कापणं सोपं जातं. ओले हात पुसून नखं कापा. यासाठी नेलक्लिपर्स किंवा मेनीक्युअर सिझर्स वापरू शकता. पण नेलक्लिपर्सनं नखं कापणं जास्त सोपं आहे. नेलक्लिपर्समध्ये त्वचेचा भाग येता कामा नये. त्याचप्रमाणे नखं खूप जवळून कापल्यास वेदना जाणवतात. नखं अर्धवट तुटल्यासही खूप वेदना होतात. अयोग्य पद्धतीने नखं कापली तर जिभाळी लागते. म्हणूनच हे काम शांतपणे करा.

## धमाल

### घरातच पहा चित्रपट


मुलांनो, सुटीचाही दिनक्रम आखून घ्या. या दिवसात बऱ्याच गमतीजमती करता येतील. कंटाळा घालवण्यासाठी एखाद्या शनिवारी घरातच थिएटरसारखं वातावरण तयार करा. चित्रपट बघाताना आपण जे पदार्थ खातो ते घरीच बनवा. पॉपकॉर्न, सँडविच घरी करा. कोल्डड्रिंक आणा. मग सर्वांनी घरीच छानसा चित्रपट बघा. गप्पा मारा. मित्रमैत्रिणींसोबतही असा बेत आखता येईल.



## योगा टाईम

### करा धनुरासन

मुलांनो, पाठीला धनुष्यासारखा बाक देऊन आणि छाती वर उचलून तुम्ही धनुरासन करू शकता. यामुळे तुमच्या पाठीच्या कण्याला बळकटी मिळेल. शाळेत जाताना तुम्ही पाठीवर भलंमोठं दप्तर घेता. त्यामुळे हे आसन नियमितपणे करा. याचे खूप लाभ होतील. सुटीत योगाच्या क्लासलाही जाता येईल. या आसनाचे व्हिडिओ यू ट्यूबवरही पहायला मिळतील.



# ओळखा पाहू

जिज्ञासा

१) फिरोज गांधी पुरस्कार कोणत्या क्षेत्रासाठी दिला जातो?
२) कोणत्या क्षेत्रातल्या योगदानासाठी गोल्डमॅन पुरस्कार दिला जातो?
३) टेंपलटन पुरस्कार मिळवणारा पहिला भारतीय कोण?
४) ऑस्करमध्ये जीवनगौरव पुरस्कारने सन्मानित झालेली पहिली भारतीय व्यक्ती कोण?
५) आशिया खंडातलं सर्वात मोठं ट्युलिप गार्डन कोणतं?
६) अरबी समुद्राची राणी असं भारतातल्या कोणत्या शहराला म्हणतात?
७) प्रसिद्ध गोलकोंडा किल्ला कोणत्या राज्यात आहे?
८) 'राणी की वाव' भारतातल्या कोणत्या राज्यात आहे?
९) द ग्रेट मॉस्क ऑफ कॉर्द्रोबा कोणत्या देशात आहे?
१०) कुंजुरानी देवी हे नाव कोणत्या खेळाशी संबंधित आहे?

उत्तर : १) पत्रकारिता २) पर्यावरण रक्षण ३) डॉ. एस. राधाकृष्णन ४) सत्यजित रॉय ५) इंदिरा गांधी मेमोरियल ट्युलिप गार्डन ६) कोचीन ७) तेलंगणा ८) गुजरात ९) स्पेन १०) वेट लिफ्टिंग

# लाईटवाली बॅकपॅक

व्हॉट्स न्यू?

मुलांनो, फिरायला जाताना तुम्ही बॅकपॅकमध्ये सामान भरता. बॅकपॅकचा वापर करणं अगदी सोपं असतं. बॅग पाठीला अडकवली की झालं काम. पण काही वेळा प्रवासात आपली बॅग हरवते. अंधारात आतलं सामान दिसत नाही. या सगळ्या अडचणी दूर करण्यासाठी इटलीतल्या 'अगाजी डिझाइन्स' या कंपनीने एक भन्नाट बॅकपॅक तयार केली. या बॅकपॅकमध्ये 'फिंगरप्रिंट सेंसर' बसवण्यात आला असून त्यामुळे त्यातलं सामान चोरता येणार नाही. 'अँटी थेफ्ट फिंगरप्रिंट सेंसर' हे या बॅगेचं मुख्य वैशिष्ट्य. अशी सोय असलेली ही जगातली पहिलीच बॅकपॅक आहे. अंधारात आपल्याला बॅगेतल्या वस्तू दिसत नाहीत. मग भलतीच वस्तू बाहेर काढली जाते. बॅगेत काहीतरी सांडतं. असं होऊ नये म्हणून या बॅकपॅकच्या आत दिवे बसवण्यात आले आहेत. हे दिवे लावले की तुम्हाला आतलं सामान अगदी नीट दिसेल. तुम्ही जंगल सफारीला गेलात किंवा रात्री सायकल चालवताना अंधार असेल तर या बॅगेचा वापर करता येईल. बॅगेच्या बाहेरच्या बाजूलाही दिवे बसवण्यात आले आहेत. यात मोबाईल चार्ज करण्याचीही सोय असेल. त्यामुळे फिरायला गेल्यावर मोबाईल चार्ज कसा करायचा हा प्रश्न तुम्हाला पडणार नाही. या बॅकपॅकमध्ये भरपूर कप्पे आहेत. लॅपटॉपसाठी वेगळा कप्पा तयार करण्यात आला आहे. दोन मोठे कप्पे आणि इतर छोटे कप्पे मिळून १५ पेक्षा जास्त कप्पे यात आहेत. त्यामुळे तुमचं सामान यात नीट बसेल. याची रचना वेगळ्या पद्धतीने करण्यात आली आहे. त्यामुळे पाठीवर खूप वजन जाणवणार नाही. याचे पट्टे तुमच्या सोयीनुसार कमी जास्त करता येतील.




# रहस्य आयुर्मानाचं

रंजक

पृथ्वीवर नानाविध सजीवांचं अस्तित्व असलं तरी त्यांच्या आयुर्मानामध्ये बरंच वैविध्य बघायला मिळतं. काही कीटकांचं आयुष्य अवघ्या काही तासांचं असतं तर कासवासारखे काही जीव शंभर–दीडशे वर्षांपेक्षा अधिक काळ जगतात. माणसांच्या आयुर्मानातही असंच वैविध्य आढळतं. काही देशांमध्ये, परिवारांमध्ये, घराण्यांमध्ये दीर्घायुष्याची परंपरा दिसते तर काही देशांमध्ये त्या तुलनेत अल्पायुषी जन बघायला मिळतात. अर्थात हे सगळं सरासरीच्या हिशेबात लक्षात घेतलं जातं. कोणाचीही तंतोतंत तुलना होऊ शकत नाही. जीवनपद्धती आणि आहार–विहारपद्धतीचा आयुष्यमानावर परिणाम होत असतो. संशोधकांच्या एका चमूने यामागचं रहस्य शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या म्हणण्यानुसार प्लाझ्मा मेंबरेन रेडोक्स सिस्टम ही यंत्रणा पेशींपर्यंत ऑक्सिजन पोहोचवण्यासाठी झालेल्या श्रमामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई करते. वय वाढत असताना नुकसान भरपाईची ही क्षमता घटत जाते. ज्यांच्या शरीरात पीएमआरएस मॅकेनिज्म योग्य पद्धतीने कार्य करतं ते अधिक जगतात. द्राक्ष, सफरचंद, कांदा आणि ग्रीन टी या पदार्थांमध्ये बायो ॲक्टिव्ह मॉलिक्युल आढळतात. या पदार्थांचं सेवन केल्याने पीएमआरएस मॅकेनिज्म सक्षमतेने कार्य करतं. म्हणूनच आहारात या घटकांचा समावेश केला तर आयुष्य वाढतं. फलाहारामध्ये सफरचंद हा महत्त्वाचा घटक ठरतो. म्हणजेच ज्यांच्या शरीरात वर उल्लेख केलेले घटक असतात ते जास्त जगताना दिसतात.






# कलासक्त

# वेगळ्या वाटेवरचा प्रवासी...

**रुपेरी पडद्यावर वेगळ्या धाटणीच्या, विषयांच्या आणि सामाजिक आशय जपणाऱ्या चित्रपटांच्या मालिकेतील पहिले पुष्प गुंफणारे श्याम बेनेगल हे नाव काळाच्या पडद्याआड गेले. अतिशय हुशार, कलात्मकदृष्ट्या संपन्न आणि कल्पक असणाऱ्या या दिग्दर्शकाने समांतर चित्रपटांचा एक ट्रेंड सेट केला. पुढे अनेकांनी त्यांचा आदर्श पुढे ठेवत मार्गक्रमणा केली. या अर्थाने आज अनेकांचा वाटाड्या हरपला आहे.**



स्वाती पेशवे

ख्यातनाम दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या निधनाची वार्ता अत्यंत दुखद आहे. १९७५-७६ मध्ये मी त्यांच्याबरोबर काम केले. या दोन वर्षांव्यतिरिक्त कधी तसा योग आला नाही. पण आजही 'निशांत' आणि 'मंथन'चे ते दिवस आठवतात. पुढे त्यांच्या 'भूमिका'चे चित्रीकरण पुण्यात सुरू होते आणि त्यात मी पाहुण्या कलाकाराची भूमिका बजावली होती. मात्र त्याला काम म्हणता येणार नाही. हे सगळे बघता त्यांच्याबरोबर काम केलेल्याला सुमारे पन्नास वर्षांचा काळ उलटला आहे. त्यानंतरच्या काळात त्यांच्या चित्रपटात मी नसण्यामागे काही कारणे होती. त्यातील एक म्हणजे मी पुण्यात राहणारा आणि दुसरे म्हणजे मी हॉस्पिटलमध्ये काम करायचो. त्यामुळे वेळेची गणिते जमवण्यात अडचण यायची. खेरीज आपल्या चित्रपटांमध्ये नवनवीन लोकांना संधी देणे त्यांना आवडायचे. त्यामुळेच एनसीडीमधून उत्तीर्ण झालेल्या अनेकांना त्यांनी ब्रेक दिला. त्यामध्ये नसिरुद्दीन शहा, ओम पुरी, शबाना आझमी, नीना गुप्ता, स्मिता पाटील अशी नावे घेता येतील. या सगळ्याबरोबर हेदेखील मान्य करायला हवे की, प्रत्येक निर्माता-दिग्दर्शकाचे काही गट असतात. तसा त्यांचाही होता. जसा जब्बार पटेल आणि आम्हा मंडळींचा एक ग्रुप होता. तसेच हे काहीसे. अर्थात त्यांनी चित्रपट करणे बंद केल्यामुळे तोदेखील पुढे बंद झाला ही बाब वेगळी... अशाच प्रकारे सत्यदेव दुबेंचे थिएटर युनीट होते. त्यातून ते अमरीश पुरी, अमोल पालेकर आणि पुढे शशी कपूरसारख्या कलाकारांना चित्रपटांमधून घेत राहिले. याला आपण प्रवाह बदलत जातो, असेही म्हणू शकतो. अर्थातच प्रवाह बदलला की विचारही बदलत जातात.


शाम बेनेगल यांच्या चित्रपटांनी प्रवाह आणि विचार बदलण्याचे काम केले. या माणसाने अगदी जिद्दीने या क्षेत्रात पाय रोवले आणि खंबीरपणे होता त्या जागी उभा राहिला. त्यांना पहिली फिचर फिल्म करण्यासाठी तब्बल वीस वर्षे वाट पहावी लागली. त्याआधी ते जाहिराती, डॉक्युमेंटरी, कॉर्पोरेट फिल्मस या क्षेत्रामध्ये कार्यरत होते. मात्र योग्य संधी मिळताच त्यांनी फीचर फिल्म केली आणि 'अंकुर' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाने समांतर चित्रपटांच्या विश्वात एक ट्रेंड सेट केला. तोपर्यंत हे वारे बंगाल आणि मल्याळी चित्रसृष्टीपुरतेच सीमित होते. त्यामुळेच हिंदी चित्रसृष्टीत समांतर चित्रसृष्टी सुरू करण्याचे सगळे श्रेय श्याम बेनेगल यांना जाते. १९६०-७० च्या दशकात समांतर सिनेमा जन्माला आला, वाढला पण अल्पायुषी ठरला, कारण टेलिव्हिजनचे विश्व विस्तारण्याचा तोच काळ होता. त्यामुळे टीव्ही मोठा झाला तसे समांतर चित्रपट करणारे सगळे तिकडे वळाले. याचे कारण म्हणजे तेवढ्या बजेटमध्ये चित्रपट करणे, तो प्रदर्शित करणे शक्य होत नव्हते. हा प्रवाह थांबण्यामागील हे आर्थिक कारणही लक्षात घ्यायला हवे. म्हणूनच सत्यजीत रे यांच्यापासून श्याम बेनेगलांपर्यंत सगळ्यांनी टेलिव्हिजन मालिका केल्या. अर्थात त्यातही त्यांनी वेगळेपण दाखवले. 'यात्रा', भारत की खोज' यासारख्या मालिका आजही अनेकांच्या स्मरणात असतील.

असे असले आणि चांगले नाव झाल्यानंतरही श्याम बेनेगल यांचा पुढचा प्रवास सुकर झाला, असे म्हणता येणार नाही, कारण अशा दिग्दर्शकांनाही निर्माते मिळणे अवघड जातेच. श्याम बेनेगल यांनाही या समस्येचा सामना करावा लागला. म्हणून त्यांनी 'मंथन' केला. यातही त्यांनी सामाजिक विषयालाच हात घातला होता. असाच काळ सरला आणि पुढे पुढे तर ते केंद्र सरकारचे लाडके दिग्दर्शक झाले. 'मेकिंग ऑफ महात्मा', नेताजी सुभाषचंद्र', 'हरीभरी', 'भारत: एक खोज' यासारखी उदाहरणे याची साक्ष देतील. थोडक्यात, प्रोड्युसर म्हणून केंद्र सरकारची साथ मिळवण्याचे भाग्य त्यांना लाभले आणि त्यामुळेच आपल्याला हवे तसे चित्रपट त्यांना करता आले. आधी उल्लेख केल्याप्रमाणे याच कारणास्तव पुढे त्यांना प्रोड्युसर मिळण्यात खूप अडचणी आल्या.

वेगळ्या शैलीचे, सामाजिक विषयांना हात घालणारे, वेगळा प्रवाह निर्माण करणारे चित्रपट दिल्यामुळे जगात त्यांचे मोठे नाव झाले. ठिकठिकाणी ज्युरी म्हणून त्यांना आमंत्रणे येऊ लागली. त्यांचा वेगळा चाहतावर्ग निर्माण झाला आणि हे नाव चित्रसृष्टीमध्ये वेगळा दबदबा निर्माण करणारे ठरले. मुळात श्याम हुशार होते. त्यांचे वाचन अफाट होते. गिरीश कर्नाड आणि त्यांच्यामध्ये अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध होते. आमच्या तिघांबद्दल बोलायचे तर 'सारस्वत मैत्री' होती, असे गमतीने म्हणता येईल. त्यांची आणि गिरीशची मैत्री बरीच घट्ट होती. मुळात अभिनेता नसणाऱ्या गिरीशला त्यांनी या साच्यामध्ये चपखल बसवले.

व्यक्ती म्हणून ते मोठे होतेच. कुतूहल जपणारा, अभ्यासू असा हा माणूस होता. माझे त्यांच्याबरोबरचे संबंधही अगदी जिव्हाळ्याचे होते. कधीही भेटलो तरी आपुलकीने विचारपूस करणारा तो चांगला मित्र होता. पद्मश्री मिळाल्यानंतर माझे अभिनंदन करण्यासाठी ते खास मुंबईहून आले होते. थोडक्यात, बराच काळ एकत्र काम केले नसले तरी आमच्या संबंधांमध्ये वा मैत्रीमध्ये कधी दुरावा निर्माण झाला नाही. भेटल्यानंतर मनमोकळ्या गप्पा व्हायच्याच आणि त्याच वेळी, मी तुला एक काम देणे लागतो, असेही त्याचे वाक्य असायचे. तो योग आला नाही, ही बाब वेगळी. पण त्यामुळे नात्यामध्ये कधी फरक पडला नाही. खरे सांगायचे तर जब्बार, माणिकदा वा श्याम यांच्या युनिट्समध्ये एखाद्या कुटुंबासारखे वातावरण असायचे. सगळे त्याच आपुलकीने काम करायचे. पुढे काळ बदलला, टीव्ही आला आणि त्याचेही कार्पोरेटायझेशन झाले. त्यावर कमी बोलावे तेवढे बरे. पण तो काळ परत आला तर मला सिनेमा करायला परत मजा वाटेल हे मात्र नक्की. श्याम बेनेगल यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ●●

## एक लाट किनारी विसावली: रोहिणी हट्टंगडी, ज्येष्ठ अभिनेत्री



श्याम बेनेगल हे समातंर चित्रसृष्टीतील फार मोठे नाव. तसे पहायला गेले तर त्यांच्यापासूनच समांतर चित्रपटाच्या चळवळीला सुरूवात झाली. त्यांच्याबरोबर अनेकांनी आपला या सृष्टीतील प्रवास सुरू केला. शबाना आझमी हे यातील एक नाव. श्याम बेनेगल यांच्या पहिल्या फिचर फिल्मपासूनच तिने या क्षेत्रात प्रवेश केला. आधी ते जाहिरात विश्वात कार्यरत होते. मात्र पुढे त्यांचा प्रवास या वेगळ्या वाटेकडे वळला. तो इतका सुंदर होता, की त्यांच्याकडे बघूनच अनेकांना याकडे वळण्याची प्रेरणा आणि हिंमत मिळाली. म्हणूनच ते अनेकांचे गुरू होते. अनेकांचे प्रेरणास्थान होते. त्या काळात आमच्या पिढीतील सगळेच संघर्ष करत होतो. प्रत्येकजण आपापल्या वाटेने पुढे जात होता. काही काळाने मीदेखील या क्षेत्रात स्थिरावले. ते माझे काम बघत होते. 'पार्टी' या चित्रपटातील काम बघून आवर्जून भेट घेत त्यांनी मला शाबासकी दिली होती. खूप छान काम केले आहेस, तू मोठ्या पारितोषिकाला पात्र आहेस... असे ते तेव्हा म्हणाले होते. त्यावर गमतीने मी त्यांना 'श्यामबाबू, तुम्ही मला कोणतेही पारितोषिक देऊ नका, एक रोल द्या' असे म्हटले होते. दुर्दैवाने तो योग कधी आला नाही. कदाचित त्यांच्याबरोबर काम करण्याचे माझे भाग्य नव्हते, असे म्हणावे लागेल आणि ही खंत कायमच मनात राहील. श्यामबाबू कधीच कोणत्या प्रवाहात वाहत गेले नाहीत. त्यांनी कायम स्वत:ला पाहिजे तसेच चित्रपट केले. आपल्याला रुचतील तेच विषय निवडले. उदाहरणादाखल फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळवणारा त्यांचा 'जुनून' बघा. यातही त्यांनी ब्रिटीशांच्या काळातला विषय घेऊन वैविध्य जपले होते. त्यावेळी तो पूर्णपणे नवीन असा विषय होता आणि मांडणीही वेगळी होती. अशा प्रकारे आपल्या प्रत्येक चित्रपटामध्ये त्यांनी वेगळेपण जपले. त्यांना कधीच प्रसिद्धीच्या मागे जावेसे वाटले नाही. त्यामुळेच त्यावेळी सत्यजीत रे वा त्यासारख्या मंडळींचा प्रभाव असला तरी ते आपली शैली जपू शकले. ती समर्थपणे लोकांसमोर आणू शकले. असे वेगळेपण जपण्यासही ताकद लागते. अर्थात त्यांचे सगळे चित्रपट खूप चालले, प्रचंड कमाई केली असे नाही. पण त्यांचा प्रत्येक चित्रपट पाहून लोक प्रभावित झाल्याचेही नाकारुन चालणार नाही. हा चित्रपट वेगळा आहे, काही तरी वेगळे समोर आणतो आहे, हे त्यांची प्रत्येक अभिव्यक्ती बघून जाणवत राहिले. अगदी हंसा वाडकर यांच्या आयुष्यावर बेतलेल्या 'भूमिका' सारख्या चित्रपटाचा विचार केला तरी ही बाब जाणवते. असे नवनवीन विषय त्यांनी रुपेरी पडद्यावर आणले. ते प्रेक्षकांनाही भावले आणि समिक्षकांनाही दखल घ्यावी लागली. श्याम बेनेगल अत्यंत हुशार आणि विचारी होते. ट्रेंड सेट करणारे होते. स्मिता पाटील, अमोल पालेकर, अमरिश पुरी ही सगळी त्यांची नटमंडळी होती. अमरिश पुरी यांच्या वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका तर केवळ त्यांच्याच चित्रपटांमध्ये बघायला मिळतात. एरवी खलनायकी भूमिकांमध्ये दिसले तरी श्यामबाबूंच्या चित्रपटांमध्ये त्यांना खऱ्या अर्थाने अभिनयातील वैविध्य दाखवण्याची संधी मिळाली, असे म्हणता येईल. नसीर, ओम, शबाना अशी किती तरी नावे घेता येईल. त्या वेळच्या या पिढीने वेगळा प्रभाव निर्माण केला, एक काळ गाजवला. त्यातील एक मोठे नाव आता आपल्यात नाही याचे दु:ख आहे.

# सी. आय. डी. मालिकेचे 'कमबॅक...'

श्री. धनंजय शेटये

२१ जानेवारी.१९९८ रोजी सी.आय. डी. अर्थात गुन्हा अन्वेषण विभागावर आधारित तपास कार्याचा कलात्मक वेध घेणारी मालिका सुरू केली. निर्माता बी. पी. सिंग यांनी टेलिव्हिजन जगतात एक नवा प्रयोग प्रचंड यशस्वी करुन दाखविला होता. रोजच्या सासू सुनांच्या कटकारस्थानांचा डेलीसोप दूर सारुन 'क्राईम थ्रिलर' मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आल्यावर ती प्रचंड लोकप्रिय झाली. 'इन्स्पेक्टर दया' 'इन्स्पेक्टर अभिजित' 'ए.सी.पी. प्रद्युम्न' 'डॉक्टर तारिका' 'सचीन' 'फ्रेडी' या व्यक्तीरेखांनी तर सर्वच प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. लहान मुलांनी तर ह्या व्यक्तीरेखा अतिशय लोकप्रिय केल्या. प्रचंड लोकप्रियता लाभलेली ही मालिका वीस वर्षे अविरतपणे चालू राहिली. टी. आर. पीचा उच्चांक प्रस्थापित करणारी ही मालिका यशाच्या सर्वोच्च शिखरावर असताना अचानकपणे बंद करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला. खरंतर प्रेक्षकांनाही प्रचंड धक्काच बसला होता. सी.आय. डी. मालिकेची लोकप्रियता किंचितही कमी झाली नव्हती. दिवसेंदिवस लोकप्रियता वाढत असताना निर्मात्यांनी घेतलेला मालिका बंद करण्याचा निर्णय अनाकलनीय होता. अभिजित श्रीवास्तव, दयानंद शेट्टी, शिवाजी साटम, श्रद्धा मुसळे, दिनेश फडणीस यांच्या दमदार अभिनयाने ही मालिका यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचली होती. दमदार रहस्यमय कथानक, चित्तथरारक कॅमेरोग्राफी, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साकारलेली नवी धडाकेबाज ॲक्शन. दयाचे दरवाजा तोडून इंट्री घेणं, ए.सी. पी. प्रद्युम्न यांच्या

'कुछ तो गडबड है दया!'

या डायलॉगने तर एक वेगळीच ओळख निर्माण केली होती. दर्जेदार खिळवून ठेवणारे कथानक. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत कोण गुन्हेगार आहे हे एक प्रकारचं अनोखे कोडे निर्माण करायला लावणारा चित्तथरारक सस्पेन्स. विलक्षण डावपेच, षडयंत्र रचून शाकीर गुन्हेगारी कशी कार्यरत असते आणि जाँबाज ऑफिसर कसे आरोपीचा शोध घेतात यांचा संघर्षमय ड्रामा प्रेक्षकांना एका जागी खिळवून ठेवायचा. नवनवीन कथानक, आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगातील गुन्हेगारीची नवी तंत्रे व कौशल्ये याचे उत्तम रसायन लेखक आपल्या कथानकात गुंफून करून लोकांना गुन्हेगारी जगापासून सावधगिरीचे बाळकडूच जणू ही मालिका देत होती. आशुतोष गोवारीकर, दीपक शिर्के सारखे कलावंतांच्या अभिनयाने ही एक काळ सी.आय. डी. मालिका प्रचंड गाजवली होती. परंतु खरी ओळख निर्माण केली ती फक्त एसीपी प्रद्युम्न, इन्स्पेक्टर दया सर, अभिजित सर, फ्रेडी, सचिन, श्रेया, काजल, डॉ. तारिका या प्रतिभावंत कलाकारांच्या




दमदार अभिनयाने आबालवृद्धांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

आता सी.आय.डी. टीव्ही मालिका दुसरा सिझन २१ डिसेंबर. २०२४ पासुन सुरु झाला आहे. पुन्हा एकदा नव्या तंत्रज्ञानाच्या जगात गुन्हेगारी जगताचा पर्दाफाश करणारे चित्तथरारक सस्पेन्स थ्रिलर पाहायला खूप मजा येत आहे. सोनी टीव्हीला. स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करून देणारी एकमेव मालिका म्हणजे सी. आय. डी. होय. पुन्हा एकदा नव्या रुपात तीच जुनी सी. आय. बीच संपूर्ण टीम अभिनय करताना पाहत असताना प्रेक्षकवर्ग प्रचंड समाधानी दिसत आहे. गतवर्षी अनंतात विलीन झालेला अभिनेता दिनेश फडणीस नसल्याने थोडीशी उणीव भासू लागते.सी. आय. डी. मधील फक्त विनोदी कलावंत दिनेश फडणीस 'फ्रेडी' नसल्याचे शल्य टोचत राहते. दिनेश फडणीस अभिनयाबरोबरच उत्तम लेखनही करत होते. त्यांनी सी. आय. डीच्या काही भागांचे लेखनही केले होते.

सी. आय. डीचा नवा सिझन बघताना आपण एखादा थरारक ॲक्शन सिनेमा पाहत आहोत असेच वाटत राहते. दया, अभिजितची जबरदस्त ॲक्शन मनाचा वेध घेते. अभिजितची मुकी मानसकन्या आणि अभिजितचे पितृप्रेम अधोरेखित करणारा पहिला भाग म्हणजे प्रेक्षकांच्या भावनिक स्नेहबंधाना गवसणी घालणारा जबरदस्त अभिनयाने पारणे फेडले. बाप आणि मुलीच्या स्नेहरुपी प्रेमाचा जिव्हाळा दर्शविणारा खरंतर तो सीन पाहताना किंचित डोळे ओले करुन जातो.एकंदरीत सी.आय.डीची हा नवा सीझन जबरदस्त लोकप्रियता मिळवत जाईल यात तीळमात्र शंका नाही. गुन्हेगारी जगताचा नवा चेहरा आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हा अन्वेषण विभागाने तपास कार्याचा कलात्मक घेतलेला वेध पाहण्याजोगा चित्तथरारक सस्पेन्स थ्रिलर म्हणजे सी. आय.डीचा नवा सीझन आहे. कौटुंबिक मालिकांच्या बोथटपणाला तीलांजली देत नवा सीझन तरुणाईलाही भुरळ घालत आहे. लहान मुलांना तर या मालिकेचे प्रचंड आकर्षण आहे.

उत्कंठावर्धक कथानक चित्तथरारक कॅमेरोग्राफी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साकारलेली नवी कोरी क्राईम स्टोरी अन् अनुभवी कलावंत यामुळे सी. आय. डी. नवा सिझन जबरदस्त कमाल करणार यात तीळमात्र शंका नाही. आमच्या बालपणापासून ही मालिका आवडती मालिका ठरलेली आहे. लहान मुलांना विशेष आकर्षण असायचे. कधी कधी लज्हान मुलांचे शौर्य, धाडस, प्रसंगावधान हे गुण जोपासणारा विशेष भाग प्रसारित झाला की मग शाळेत, क्लासेसमध्ये सी. आय. डी मालेकीचीच चर्चा रंगवायची. लहान मुलांना वाटायचे आपण पुढे मोठे झाल्यावर सी.आय.डी. ऑफिसर बनावे हे स्वप्न बनू लागले. शुक्रवारी रात्री साडे नऊ वाजता पुढे रात्री दहा वाजता अशी वेळ असली तरी बच्चेकंपनी नव्या एपिसोडची वाट पाहत असायचे. 'सावधान इंडिया', 'क्राईम पेट्रोल' आणखी बऱ्याच मालिका अवतरल्या असतील पण सी.आय.डी ही मालिका एवढी गाजली की या लोकप्रिय मालिकेचे अपत्य निर्माण होऊ लागली. दया अभिजित ह्या व्यक्तीरेखा कुटुंबातील सदस्य असल्यासारखे भासू लागले. सीआयडी ही सोनी वाहिनीवर प्रसारित होणारी एक हिंदी भाषेतील मालिका आहे, जी भारतातील सर्वात जास्त काळ चालणारी मालिका आहे. गुन्हेगारी आणि गुप्तहेर प्रकारावर आधारित या मालिकेत शिवाजी साटम (एसीपी प्रद्युम्न), दयानंद शेट्टी (इन्स्पेक्टर दया) आणि आदित्य श्रीवास्तव (इन्स्पेक्टर अभिजित ) मुख्य भूमिकेत आहेत. त्याचे आरंभकर्ता, दिग्दर्शक आणि लेखक ब्रिजेंद्र पाल सिंग आहेत. हे फायरवर्क्स नावाच्या कंपनीने तयार केले आहे, ज्याचे संस्थापक ब्रिजेंद्र पाल सिंग आहेत.

# नाट्य प्रवासातील गुणी रंगकर्मी प्रमोद पाटील

दत्तात्रेय म्हात्रे

शेकडो वर्षाहून अधिक वर्षाची नाट्य परंपरा लाभलेलं चिरनेर हे नाट्यवेड गाव. या गावात प्रमोद नामदेव पाटील यांच्या आजोबा पणजोबांपासून त्यांच्या घराण्याला नाट्यकलेचा वारसा लाभलेला आहे. यात रंगभूमीवरील श्रेष्ठ नटांच्या प्रभावळीत आजही श्रेष्ठ रंगनायक म्हणून त्यांचे काका नटवर्य नाना पाटील व नाट्य भूषण प.मा. पाटील यांचे नाव अग्रक्रमाने व आदराने घेतले जात आहे. हे दोन महानायक नाट्य विश्वातील अनमोल अशी रत्ने होती. त्यांनीच त्यांच्या नाट्यगुणांना खऱ्या अर्थाने खतपाणी घातले. आणि त्यांच्यातला नटरंग जागा झाला. आणि त्यांच्या अभिनयाची वाटचाल पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले. असे जेव्हा रंगकर्मी तथा दिग्दर्शक प्रमोद पाटील सांगतात, तेव्हा त्यांच्या तळमळीबरोबर, नम्र स्वभावाचे दर्शन घडते.

शालेय जीवनात १९७८ साली शाळेच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमात 'विठ्ठल तो आला आला' ही त्यांची रंगभूमीवरची पहिली नाटिका. यात त्यांनी केलेल्या टेलरच्या भूमिकेचे प्रेक्षकांकडून खूप कौतुक झाले होते. त्यानंतर श्री गणेश नाट्य मंडळ चिरनेर मुळपाड्याच्या माध्यमातून अभिनयाला सुरुवात झाली. नाट्य अभिनयसाठी प्रमोद पाटील यांच्याकडे रुबाबदार व्यक्तिमत्व, आवाज, संवादफेक आणि अभिनय या अचूक गोष्टी असल्यामुळे त्यांच्या वाट्याला शिवाजी, संभाजी, आदिलशहा, सरपंच, सामाजिक नाटकातील खलनायक अशा व्यक्तीरेखा आल्या. यात वारणेचा वाघ, जहागीरदार, मर्द मराठा दख्खनचा, हे राज्य श्रींचे, स्वातंत्र्याची सिंहगर्जना, अफजल खान, कुलांगार, का व्यर्थ जन्मले जगी, रायगडचा राजेश्वर, गाव गुणी सरपंच खुनी, अग्निदिव्य, तपस्वी अशा अनेक नाटकातून त्यांनी नायक-खलनायक या व्यक्तिरेखांबरोबर छोट्या-मोठ्या भूमिका साकारून आपल्या अभिनयाची छाप त्यांनी नाट्य विश्वात उमटविली. शिवाजी, संभाजी,





आदिलशा या व्यक्तीरेखांचा सखोल अभ्यास आणि भूमिकेशी समरस होण्याच्या वृत्तीमुळे त्यांनी या भूमिकांमधून स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करून, अभिनय कौशल्याच्या बळावर त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. श्री गणेश नाट्य मंडळाच्या माध्यमातून सादर केलेले सर्व प्रयोग दमदार झाले. मात्र दिग्दर्शक आणि प्रेक्षकांचे मार्गदर्शन व सूचना प्रमोद पाटील यांनी नेहमीच लक्षात ठेवल्या. म्हणूनच त्यांनी केलेल्या प्रत्येक भूमिकेचं सोनं झालं. एका रात्री या स्पर्धेच्या एकांकिकेबरोबर त्यांनी चार नाटके दिग्दर्शित केली आहेत. कलासंगम निर्मित ठाणा वाडा येथे १९८३ मध्ये श्री गणेश नाट्य मंडळाच्या वतीने 'का व्यर्थ जन्मले जगी' हा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. या नाटकास प्रथम पारितोषिक, तर नाटकातील त्यांच्या अण्णासाहेब या भूमिकेसाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे राज्य नाट्य स्पर्धेत धडक मारली. आणि १९८७ मध्ये आंतर विभागीय नाट्य स्पर्धेत रायगड विभागाने कोल्हापूर येथे सादर केलेल्या 'थेंब थेंब आभाळ' या नाटकास प्राथमिक फेरीत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तर याच स्पर्धेच्या अंतिम फेरीत याच नाटकाला औरंगाबाद येथे प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. या नाटकात त्यांना अभिनयाचे उत्तेजनार्थाचे पारितोषिक मिळाले. तर स्त्रीपात्र म्हणून विजया कुडव यांना अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळाले. मास्टर भगवान यांच्या हस्ते सन्मान झाला. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे ३८ व्या आंतर विभागीय नाट्य स्पर्धेत प्राथमिक फेरीत मुंबई विभागाने सादर केलेल्या नातीगोती या नाटकास प्रथम क्रमांक, तर त्यांच्या गायतोंडे या भूमिकेसाठी उत्तेजनार्थाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. पुणे येथे राज्य नाट्य स्पर्धेसाठी एसटी महामंडळाच्या वतीने सादर केलेल्या 'स्वप्न एका वाल्याचे' या नाटकात मी इन्स्पेक्टरची (फौजदार) भूमिका बजावली. नाटकातील इन्स्पेक्टरच्या भूमिकेसाठी केसांची पोलीस कट हवी होती. मात्र त्यावेळी हिप्पीची फॅशन असल्यामुळे, मी केसांची हिप्पी ठेवली होती. या नाटकास प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. परीक्षक गजेंद्र गडकर यांनी या नाटकाचे परीक्षण केले होते. दरम्यान २०१५ मध्ये अँड टीव्हीवर 'वारीस' या हिंदी मालिकेत संधी मिळवित गावाचा न्यायनिवाडा करणाऱ्या सरपंचाची भूमिका साकारण्याची त्यांना संधी मिळाली. मात्र अभिनयाचे नाट्यगुण असताना देखील त्यांची या दुनियेत खास ओळख नसल्यामुळे त्यांना या क्षेत्रात पुढे जाता आले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला आहे. वडिलांच्या शिकवणीनुसार त्यांनी जीवनाची वाटचाल केली. त्यामुळे लहान वयातच पाच वर्षे टेलरिंगचे काम केले. त्यानंतर एसटी डेपोत कंडक्टर म्हणून सेवेत रुजू झाले. पुढे जाऊन वाहतूक नियंत्रक म्हणून काम केले आहे. काका नटवर्य नाना पाटील हि अभिनयाची कार्यशाळाच होती. आई बाबांचे आशीर्वाद, काकांचे प्रोत्साहन आणि सहकलाकारांनी आणि रसिकांनी दिलेले प्रेम यामुळे त्यांना नाट्य विश्वात सतत उमेद मिळत गेली. त्यामुळे निश्चितच त्यांचे नाट्य प्रेम वाढत गेले. आणि त्यांच्याकडून ते जोपासले गेले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)